
# श्री साईलीला



द्वारकामाईतील श्री साईबाबांची छबी
व श्री साईबाबांची प्रत्यक्ष बसावयाची शिळा

एप्रिल १९७७ ] खास रामनवमी विशेषांक [ मूल्य ६० पैसे

# अनुक्रमणिका एप्रिल १९७७


| | | |
|---|---|---|
| १) संपादकीय | — | शिरडीतील रामजन्मोत्सवाची कथा |
| २) चावडी मंदिरातील श्री शिवनेर स्वामी | — | सदानंद चेंदवणकर |
| ३) प्रभुरामचंद्राची कुंडली | — | होरालंकार श्री शं. वा. देवधर |
| ४) प्रभाते मनी राम चिंतीत जावा | — | सदानंद चेंदवणकर |
| ५) सकळ जगाचा निजविश्वास साईराम | — | डॉ. के. भ. गव्हाणकर |
| ६) श्रीसाईरामाची रामकथा | — | श्री. चकोर आजगांवकर |
| ७) मानध उन्नतिचे सोपान– रामायण | — | डॉ. अनिल जायस्वाल |
| ८) कवि – रहीम | — | श्री. विनायक पाठक |
| ९) साई भक्तांचा पत्रव्यवहार | — | — |
| १०) निष्कलंक जीवन | — | श्री. शाम जुवळे |
| ११) सद्‌गती | — | शशिकला साळगांवकर |
| १२) सत्य साक्षात्कार | — | श्री. शिवरामबुवा राणे |
| १३) मेरे जीवन प्राण आधार | — | कु. पुष्पलता मोहरे |
| १४) साथी नाम–गजर | — | श्री. स. वि. गद्रे |
| १५) श्रीसाई भगवान | — | श्री. डी. बी. पोतनीस |
| १६) नामसाधना कशी घडेल | — | श्री. ज. प्र. मिरीकर |
| १७) भावपुष्प | — | श्री. पी. के. शिरसाट गुरुजी |
| १८) शरणागती | — | श्री. महादेव दत्तात्रय भिडे |
| १९) शिरडी वृत्त | — | — |

जगा लावावे सत्पथी। हेचि साईलीलेची कृति॥



# श्री साई वाक्सुधा

संतवचनीं धरितां विकल्प।
अयशस्वी तयाचे संकल्प।
निःसत्व निष्फळ वाग्जल्प।
परमार्थ अल्पही साधेना॥ १३९॥

वंद्य मानी जो गुरुवचनार्थ।
सफल तयाचा स्वार्थ परमार्थ।
देखे जो दोष कुटिलता तेथ।
अधःपात पावे तो॥ १४०॥

गुरुसेवेसी जो तत्पर।
गुर्वाज्ञेचाच ज्या आदर।
इष्टानिष्टतेचा सर्व विचार।
गुरुशिरावर तो ठेवी॥ १४१॥

गुर्वाज्ञेचा तो किंकर।
स्वतंत्र नाहीं तया विचार।
नित्य गुरुवचन पालन पर।
सारा सार देखेना॥ १४२॥

चित्त साईं नामस्मरणीं।
दृष्टी साईसमर्थ चरणीं।
वृत्ति साईध्यान धरणीं।
देह कारणीं साईंच्या॥ १४३॥

—श्रीसाईसच्चरित्–अध्याय २३ वा

# श्रीसाईलीला


[ श्रीसाईबाबांचे संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक ]

वर्ष ५६ वे ] एप्रिल ७७ [ अंक १



: संपादक :

श्री. का. सी. पाठक,

रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

: कार्यकारी संपादक :

● डॉ. श्री. दि. परचुरे, (इंग्रजी आवृत्ती)

● श्री. सदानंद चेंदवणकर (मराठी ,, )



वार्षिक वर्गणी रु. ६–०० (ट. ख. सह)

किरकोळ अंक ६० पैसे फक्त.



: कार्यालय :

"साईनिकेतन", प्लॉट नं. ८०४–बी,

डॉ. आंबेडकर पथ, दादर, मुंबई १४.

पिन : ४०००१४

दूरध्वनी : ४४ ३२ ६१

संपादकीय—

स. न. वि. वि.

# शिरडीतील रामजन्मोत्सवाची कथा

**जेथे रामनामाचे गर्जन । फिरे तेथे विष्णूचे सुदर्शन**
**कोटी विघ्नांचे निर्दाळण । दीन संरक्षण नाम हे**



दरवर्षाप्रमाणे श्रीरामनवमी महोत्सवानिमित्य हा रामनवमी खास अंक आमच्या प्रिय श्रीसाईभक्त वाचकांच्या हाती देताना सहाजिकच आम्हास आनंद होत आहे. हा अंक छप्पन्नाव्या वर्षाचा पहिला अंक आहे हे पण विशेष लक्षात ठेवण्यासारखे आहे.

वाल्मिकी रामायण हा महान ग्रंथ भारतीयानाच नव्हे तर जगातील सर्व राष्ट्रातील जनतेला सदासर्वकाळी आदर्शवत होऊन राहिलेला असा ग्रंथ आहे. रामकथाही आदरणीय व अनुकरणीय अशी जीवनगाथा आहे. या ग्रंथाचा रचनाकाळ हजारो वर्षापूर्वीचा आहे. परंतु त्यातील जीवनमूल्ये सर्व काळातील स्त्री–पुरुषांना पिता-पुत्र, पति–पत्नी, बहिण–भाऊ, भाऊ-भाऊ माता–पुत्र, सेव्य–सेवक. गुरु–शिष्य राजा-प्रजा या सर्वांनी एकमेकांशी कशा रीतीने वागावे याचा उच्चतम आदर्श या ग्रंथातील विविध पात्रांच्या रूपाने जगापुढे ठेवण्यात आलेला आहे. प्रत्येकाने आपले जीवन सर्वोत्कृष्ट रीतीने कसे घालवावे व जगात सर्वांकडून भलेपणाचा बहुमान कसा मिळवावा हे रामायण काव्याच्या रूपाने वाल्मिकी महर्षींनी आपणास सांगितले आहे. त्यात प्रत्येकासाठी बहुमोल जीवनमंत्र सांगण्यात आलेला आहे. जगातील कोणत्याही वाङ्मयात अशा प्रकारची श्रेष्ठ कलाकृती निर्माण झालेली नाही. यात अजिबात अतिशयोक्ती नाही. रामकथा अतिशय रसाळ आहे. तिची गोडी अवीट आहे. या कथेचा एखादा बिंदू जरी प्राशन करता आला तरी तो आपल्या कल्याणासह कारणीभूत होणारा आहे.

मर्यादारूपी पुरुषोत्तम प्रभू रामचंद्राचे महात्म्य भगवान संतचूडामणि श्रीसाई-बाबांनी बरोबर ओळखले होते. जनता सुखी व्हावी, भारतात व जगात सर्वत्र आबादी आबाद, सुख समाधान व प्रेमभाव वाढत रहावा हीच बाबांची मनिषा होती. त्यासाठीच तर त्यांचा अवतार ! रामनामाचे तारक व पोषक महत्व बाबांनी अचूक ओळखले होते. जनमनावरील रामनामाची पकड बाबा बरोबर ओळखून होते, आणि म्हणूनच तर त्यांनी आपल्या हयातीत शिर्डीस रामनामाचा, उत्सवाचा सुखद सोहळा सुरू केला. आपल्या हयातीत त्यांनी तो सात आठदा बघितला, व आपल्या पश्चातही सर्वांच्या कल्याणास कारणीभूत होणारा सोहळा चालू रहावा अशी त्यांनी व्यवस्था लावून दिली. लोककल्याणासंबंधीची बाबांची ही भावना आपण समजावून घेतली पाहिजे.

शिरडीमध्ये रामजन्मोत्सव शके १८३३ मधे बाबांनी सुरू केला, व तेव्हापासून तो यंदापर्यंत प्रत्येक वर्षी हा उत्सव व्यापक स्वरूपात व उत्साहात साजरा होत आहे ही बाबांचीच कृपा होय. हा उत्सव कसा सुरू झाला याची कथा मोठी रंजक आहे.

शिरडीमध्ये गोपाळराव गुंड या नावाचे बाबांचे एक परमभक्त होते. ते वारंवार बाबांच्या दर्शनास येत. बाबांवर त्यांची आत्यंतिक निष्ठा व भक्ती होती. निष्ठेचे फळ हे केव्हा ना केव्हा मिळावयाचेच. गोपाळरावास पुत्र संतती नव्हती बाबांच्या कृपेने त्यांना तो पुढे लाभ झाला. आनंद झाला. प्रत्येक माणूस हा उत्सव प्रिय असतोच नाही का ? उत्सव म्हणजेच चार मंडळींचा एकत्र मेळावा. सर्वांनी मिळून भक्तिभावाचा आनंद लुटायचा. या गोपाळरावांना शिरडीत कोणत्यातरी निमित्याने यात्रा जमावी असे वाटून त्यांनी उरूस सुरू केला. त्यानिमित्याने गावोगावचे लोक फकीर इ. मंडळी शिरडीत जमा होऊ लागली. त्यांच्या भोजनाची नीट व्यवस्था ठेवावयाची व त्यांची शक्य तितकी सेवा करायची, यात्रा भरवायची तर जिल्हाधिकाऱ्याची परवानगी प्रथम पाहिजे. अडचण उत्पन्न झाली. आरंभकाळी एका दुष्ट प्रवृत्तीच्या अधिकाऱ्यामुळे तर परवानगीची अडचणच उत्पन्न झाली. बाबांच्या कानापर्यंत ही गोष्ट गेली. चार लोक प्रेम भावाने एकत्र जमले व त्यांनी एक-दोन दिवस घालवले तर त्यात काय बिघडले ? बाबांची इच्छा तिच्यापुढे कुणाचे काय चालणार ? शेवटी अधिकाऱ्याने परवानगी दिली.

योगायोगाने शके १८३३ मधे तो वार्षिक उरूस व श्रीरामनवमी एकदम आली. त्याच सुमारास उरूसानिमित्य भीष्म नावाचे बाबांचे एक परम भक्त शिरडीत हजर होते. याच भीष्मांनी बाबांच्या अनेक आरत्या केलेल्या आहेत. उरूसाबरोबर पुण्यपावन असा श्रीराम जन्मोत्सवही आपण का साजरा करू नये ? असे या भीष्म महाशयांना वाटू लागले. ती अर्थातच बाबांची प्रेरणा होती. कुणालातरी निमित्य मात्र करून जे जे कल्याणप्रद असेल ते ते करावयाचे ही बाबांची नेहमीचीच प्रवृत्ति होती. त्यावेळी काका

महाजनी हे बाबांच्या पूजाअर्चादी नित्यक्रमाची व्यवस्था पहावयाचे, व बाबांच्या सह-वासात असावयाचे भीष्म यांच्या मनात रामजन्म साजरा करण्याची कल्पना उद्भवली त्याबरोबर त्यांना फार आनंद झाला. बाबांच्या कानापर्यंत ही खबर जाणे व त्यांचा या बाबतीत कल लक्षात घेणे जरूरीचे होते. त्यांनी काका महाजनी यांना आपला मनोदय कथन केला. त्यांनाही तो फार आवडला. रामजन्म जर साजरा करावयाचा तर राम-कथेचे निरूपण करणारा कीर्तनकार पाहिजे. त्याकाळी शिर्डीत कीर्तनकार मिळणे कठीण होते.

रामजन्मोत्सवाच्या प्रश्नावर काका म्हणाले; " तुमची कल्पना नामी आहे. परंतु कीर्तनकाराचे काय ? "

" एवढेच ना ? मी होतो कीर्तनकार ! तुम्ही तेवढा पेटीचा सूर धरा म्हणजे झाले ! " भीष्म म्हणाले.

सुंठवडा कोणी करावा व इतर कामे कुणी करावीत त्याचीही योजना या दोघांनी मिळून केली व ती संमत करून घेण्यासाठी ही मंडळी बाबांपाशी गेली.

काका पूजासाहित्य घेऊन भीष्म महाराजांसह मशिदीत बाबांपाशी गेले. पूजा अर्चा चालू असता बाबांनीच प्रश्न केला

" काय बेत चालला होता आपला सांगा ना आम्हाला ! "

तो सवाल ऐकून त्या दोघांना अचंबा वाटला व त्याबरोबरच धीरही आला. बाबाच बुद्धी देणारे व जरूर ते कार्य करवून घेणारे मग तेथे अडचण कसली येणार ? काकांचे बोलणे ऐकून घेऊन बाबांनी रामजन्मोत्सव साजरा करण्यास आपली लगेच संमति दिली. इतकेच नव्हे तर तो शिर्डीतील अगदी पहिलाच असा श्रीरामजन्मोत्सव बाबांनी यथासांग करवून घेतला.

पुढे तिची प्रथा सुरू झाली ती श्रीसाईबाबांच्या कृपेने अगदी आजतागायत प्रतिवर्षी नेमाने व वाढत्या अतीव उत्सवाने सुरू आहे. शिर्डीतील जन्मोत्सवाच्या पहिल्या वर्षी भीष्म हे कीर्तनकार होते. पुढे दुसऱ्या वर्षी श्री बाळाबुवा सातारकर यांचे शिरडीत बाबांच्या भेटीनिमित्य आगमन झाले असता त्यांच्या कीर्तनाचा सुयोग केवळ यदृच्छेनेच घडून आला.

त्यानंतर बाबांचे परमभक्त ह. भ. प. दासगणू महाराज यांचे शिरडीत आगमन झाले असता बाबांनी श्रीरामजन्मोत्सवाची जबाबदारी विनंतीपूर्वक त्यांच्याबर सोपविली व तो बाबांचा कृपाप्रसाद मानून त्यांनीही आनंदाने स्वीकारली. जोपर्यंत शिरडीत राम-जन्मोत्सवानिमित्य येणे शक्य होते तोपर्यंत स्वतः येऊन ती जबाबदारी त्यांनी यथा-

योग्यपणे व अत्यंत सुंदर रीतीने पार पाडली. त्यांच्या पश्चात ती जबाबदारी मोठ्या भक्तिभावाने व आनंदाने श्रीदासगणू महाराजांचे पट्टशिष्य व ऋणानुबंधी ह. भ. प. अनंतराव आठवले हे आजतागायत उत्तम प्रकारे सांभाळीत आहेत इतकेच नव्हे तर त्यांची या उत्सवातील रसाळ व परिणामकारक कीर्तने हे एक महत्वाचे व प्रमुख आकर्षण होऊन राहिलेले आहे.

अशा प्रकारे शिरडीतील रामजन्मोत्सवाचा सोहळा श्रीबाबांच्या वेळेपासून सातत्याने चालू आहे.

## शिरडीतील रामनवमी उत्सव

**सर्व साईभक्तांना कळविण्यात येते की यंदा शिर्डी येथे श्रीरामनवमी महोत्सव सोमवार दि. २८ मार्च १९७७ ते बुधवार दि. ३० मार्च १९७७ पर्यंत नेहमीप्रमाणे थाटाने साजरा केला जाईल. सर्व साईभक्तांनी हेच आमंत्रण समजून उत्सवास येऊन संस्थानला शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी सर्वतोपरीने सहकार्य करावे ही विनंती.**

# शिरडीच्या चावडीमंदिरातील श्री· शिवनेर स्वामी

• सदानंद चेंदवणकर



• श्रीसाईबाबांच्या शिरडीच्या चावडी मंदिरात प्रवेश करणाऱ्या श्रीसाईभक्ताला एक सावळ्या वर्णाचे, काहीसे तरूण शिडशिडीत देहयष्टीचे, डोकीला दक्षिणी पद्धतीचे पांढरे वस्त्र गुंडाळलेले व तसल्याच रंगाचे वस्त्र आपल्या अंगावरून लपेटून घेतलेले स्वामीजी हरहमेशा दिसून येतात. सतत साईसेवेत व साईवरील वाचनात-साहित्यात व दंग असलेल्या या स्वामीजींचे नाव आहे शिवनेरबाबा. गेली कित्येक वर्षे बाबा याच अवस्थेत व याच पोषाखात दिसून आले आहेत. त्यांना कुणी झक्क पोषाख केलेले असे पाहिलेच नाही. अगदी शिरडीच्या कडक थंडीतही स्वामीजी याच पोषाखात असतात. चावडीत

आलेल्या भक्ताचे स्वागत स्वामीजी हसतमुखाने व आपुलकीने करतात, त्यांची प्रसाद, उदी, तीर्थ देऊन उठबस करतात आणि एखाद्या गरजू भक्ताच्या प्रश्नाला आशादायक उत्तरं देतात; आणि साईबाबा सर्वांना बरे करणारे आहेत, त्यांची कृपा दृष्टी त्यांच्या भक्तावर आहेच आहे असं हसत हसत उत्तर देऊन त्याचा विश्वास संपादन करतात.

श्रीशिवनेर बाबा हे मूळचे दक्षिण भारतातील कोईमतूरचे. त्यांचा जन्म तिथे १५ एप्रिल १९२७ साली झाला. त्यांच्या वडीलांचे नाव मुत्तैय्यास्वामी व आईचे नाव लक्ष्मी. बाबांचे आई-वडील श्रीशिवशंकराचे परमभक्त आणि म्हणूनच की काय त्यांनी आपल्या या मुलाचे नाव शिवनेर म्हणजे शंकरभक्त असे ठेवले. त्यांचे आई-वडील मोठे धार्मिक व श्रद्धाळू अंतःकरणाचे होते व याचाच परिणाम छोट्या शिवनेरवर झाला. लहानपणापासूनच शिवनेर देवाची पूजा अर्चा, नामस्मरण करू लागले. पुढे कोईमतूरच्या आर. एस. प्रभू हायस्कूलमध्ये त्यांनी शिक्षणासाठी प्रवेश केला व त्या शाळेतून प्रत्येक वर्षी उत्तमप्रकारे पास होत होत त्यांनी अखेरीस १९४१ ला मॅट्रिकची परीक्षा दिली. ही परीक्षा ते उत्तम प्रकारचे गुण मिळवून उत्तीर्ण झालेले आहेत. मॅट्रिक नंतर त्यांनी कोईमतूरच्या हायकोर्टात रेकॉर्डरूममध्ये अटेंडंट म्हणून नोकरी पकडली. पण या नोकरीत त्यांचे मन काही रमले नाही. चार वर्षे त्यांनी ही नोकरीची कामगिरी बजावली. १९४५ साली त्यांनी नोकरी सोडली.

पुढे १९४५ साली शिवनेर स्वामी यात्रेला म्हणून निघाले, व यात्रा करीत करीत ते मुंबईला आले. मुंबापुरीत आल्यावर गणेशपुरीच्या श्री नित्यानंद बाबांच्या दर्शनास ते गेले. श्री नित्यानंद स्वामींच्या दर्शनाने त्यांना अत्यानंद झाला. ते तिथे राहून पारायणे करीत व बाबांची सेवा करू लागले. पुढे नित्यानंदांनीच त्यांना आदेश दिला की 'काशी, द्वारका, वृन्दावन ठिकाणची यात्रा करा, तिथे जाऊन देवदर्शन करा आणि मग एका ठिकाणी स्थिर रहा." श्री नित्यानंदाच्या आदेशा प्रमाणे शिवनेर स्वामी काशीस गेले पण तिथे त्यांना योग्य काही गुरु लाभला नाही. पुढे त्यांनी देवदर्शन यथासांग यथाविधी केले.

अशाप्रकारे मजल दरमजल मार्ग करीत करीत १९५४ साली शिवनेर बाबा शिर्डीस आले व तेव्हापासून तो आजतागायत ते शिरडीसच गेली तेवीस वर्षे आहेत. शिर्डीस येण्यापूर्वी ते बारा जोतिर्लिंगापैकी एक जागृत ज्योतिर्लिंग जे श्रीओंकारेश्वर येथे जाऊन आले. शिरडीला आल्यावर त्यांना श्रीसाईबाबांनी अनेकदा दृष्टांत दिले व त्यामुळेच की काय शिरडी न सोडण्याचा त्यांनी कायम निर्णय घेतलेला आहे. शिरडीस कधी द्वारकामाई तर कधी चावडी या ठिकाणी राहून ते बाबांची अहोरात्र सेवा करतात. पहाटे चार वाजता ते उठतात व आपली नित्य नैमित्तिक कामे आटोपल्यावर ते जे सेवा

प्रारंभ करतात ते रात्री अकरा वाजेतोपर्यंत. दुपारची विश्रांती, झोप देखील ते कधी घेत नाही. दुसऱ्याचे ते नेहमी शुभ इच्छितात. आपल्याकडून जेवढे म्हणून शक्य असेल तेवढे ते दुसऱ्याकरीता हमखास करतात. कुणाकडूनही ते पैशाचीच नव्हे तर कसलीच अपेक्षा कधीच करीत नाहीत.

आणि जर का कुणी त्यांना अगदी भेट रूपाने काही दिलेच तर ते दुस-याला वाटून टाकतात. यामधे पैसे, पुस्तके, चित्रे यांचा समावेश प्रामुख्याने असतो. स्वामीजी मोठे शांत व परोपकारी बुद्धीचे आहेत. स्वामीजी मराठी अगदी शुद्ध बोलतात. मराठी प्रमाणेच इंग्रजी, गुजराती, मल्याळी, कानडी, तामीळ, तेलगू या भाषा ते अस्खलीत बोलतात. स्वामीजींचे एक बंधु श्रीरामस्वामी कोइमतूरजवळच्याच सिंगनलूर येथे एका गिरणीत नोकरीस आहेत. स्वामींच्या एकुलत्या एक भगिनीचे नाव अंबुजम. ती विवाहित असून सिंगनलूर येथेच राहाते. चावडीत गेलेला प्रत्येक हरीभक्त बाबांच्या प्रतिमेला वंदन केल्यावर तिथे असलेल्या स्वामीजींना सुहास्य मुद्रेने वंदन करतोच करतो आणि स्वामीजी सुद्धा त्या भक्तास प्रति नमस्कार करून हसत हसत निरोप देतात. स्वामीजींना त्यांच्या या महिन्यातील वाढदिवसानिमित्त शुभेच्छा.

★


# – श्रीसाईलीला –


**जगातील सर्वांत स्वस्त सचित्र मासिक**

वर्षभर श्रीसाई साहित्याचा सुगंध पसरवणारे आध्यात्मिक मासिक

वर्षातून पाच खास अंक – वार्षिक वर्गणी ट. ख. सह अवघी सहा रुपये

# प्रभु रामचंद्राची कुंडली

होरालंकार शं. वा. देवधर
७-३७ अहमद सेलर बिल्डींग, दादर १४




प्रभू रामचंद्र भारतीय संस्कृतीचे द्योतक आहेत. गेली पाच हजार वर्षें प्रभू रामचंद्रांचे गुणगान भारतात चालू आहे. त्यांची प्रसिद्ध असलेली कुंडली दिली आहे.

त्यांचा जन्म कर्क लग्नावर झालेला आहे. बहुतेक श्रेष्ठ पुरुषांचे जन्म कर्क लग्नावरच झालेले आहेत. असे आढळून येते लग्नेश चंद्र लग्नी उच्च गुरूसह (हंसयोग) असल्यामुळे अत्यंततेजस्वी, बुद्धिमान व मंगळाच्या दृष्टिमुळे सामर्थ्यवान झाले. बलवान चंद्र-गुरुमुळे सुन्दर, गोजिरे रूप, 'राजीव लोचन.' शनि मंगळाच्या दृष्टीमुळे रामाला घननीळ. नीलोत्पलश्याम वर्ण प्राप्त झाला. भाग्येश गुरु लग्नात चंद्राच्या युतीत त्यामुळे एकवचनी, एक बाणी, एक पत्नी म्हणून प्रसिद्ध झाले.

चतुर्थस्थानी उच्च राशीत शनि चतुर्थेश शुक्र उच्च. त्यामुळे श्रेष्ठ धनुर्धारी, वेदान्तवेद्योयज्ञेश, शस्त्रास्त्र विशारद, चतुर्थ हे सुखस्थान. शनिमुळे मातेला वैधव्य, सौख्याचा नाश, शनि वक्री. चंद्रावर दृष्टी असल्याने मनस्ताप. शनिची रवीवर दृष्टी त्यामुळे राज्यत्याग करून चौदा वर्षे वनवास भोगला. रवि पितृकारक त्यामुळे पित्याचा शोकान्त. आयुष्यभर रामाला गृहसौख्य मिळालेले दिसत नाही. कुटूंबसौख्य नाही. पत्नी जानकीचे रावणाकडून अपहरण व नंतर रामाकडून सीतेचा त्याग. याचे कारण म्हणजे सप्तमेश शनि व तोच अष्टमेश.

नवमेश गुरु उच्च व नवमात शुक्र उच्च. रवि पितृकारक उच्च. रामाची श्रेष्ठ प्रकारची पितृभक्ती व पित्यासाठी राज्याचा त्याग, धार्मिक वृत्ती व सत्यवचनी स्वभाव प्रसिद्ध आहे.

दशमात रवि उच्च त्यामुळे श्रेष्ठ प्रतीचा राजा लोकनायक, कारूण्यरूप, करूणाकर, अजरामर किर्ती, लोकग्रहास्तव प्रिय पत्नीचा त्याग या गोष्टी दिसून येतात.

षष्ठात राहू म्हणून अष्टलक्ष्मी योग. राहूवर शनिची दृष्टी त्यामुळे शत्रूचा नाश.

षष्ठेश गुरु उच्च असल्याने शत्रु बलिष्ठ व ब्राम्हण वर्णाचा. त्याची सप्तमातील मंगळावर दृष्टी त्यामुळे सीतेचे अपहरण.

पंचम बुद्धिस्थान व पुत्रस्थान. पंचमेश मंगळ उच्च, गुरु दृष्ट म्हणून महापराक्रमी पुत्र परंतु पुत्रसौख्य नाही; कारण पंचमस्थान पापकर्तरी योगात आहे. बुध हा बुद्धीचा कारक पापकर्तरी योगात व मनाचा कारक चंद्र शनि मंगळाने बिघडलेला यामुळे बुद्धीभ्रंश कधीही कुणी न पाहिलेला न ऐकलेला असंभव असा कांचनमृग सत्य मानून सीतेला संकटात लोटले.

सप्तमात मंगळ उच्च, गुरु चंद्राने दृष्ट व शुक्र उच्च व भाग्यात त्यामुळे पत्नी चारित्र्यवान, लावण्यसंपन्न, भूमीकन्या सीता, त्याला लाभली. कर्क लग्नावर जन्म असला म्हणजे वैवाहिक सौख्य मनासारखे मिळत नाही.

चंद्र गुरु केंद्रात बलवान, रवि बलवान अष्टमेश शनि बलवान व केंद्रात त्यामुळे रामाला प्रदीर्घ आयुष्याचा लाभ झाला.

## प्रभुरामचंद्राच्या कुंडलीत महत्त्वाचे योग

१) भाग्येश लग्नी लग्नेशासह राजयोग. अजरामर कीर्ती.

२) योगकारक मंगळाची लग्नेश चंद्रावर व भाग्येश गुरुवर दृष्टी

३) भाग्येश गुरुची दशमेश मंगळावर दृष्टी श्रेष्ठ राजा.

४) पाच ग्रह उच्च पुरुषोत्तम.

वरील योगांमुळे पुरुषोत्तम ही संज्ञा रामचंद्राला लावली जाते. रामचरित्रावर आजपर्यंत जितके वाङ्मय लिहिले गेले व जितक्या भाषेतून त्यांचे चरित्र गायले गेले असे कोणत्याही महापुरुषाच्या बाबतीत घडले नाही. भारतीय संस्कृती जोपर्यंत जिवंत आहे तोपर्यंत रामचरित्राचे गायन अखंड चालू राहील यात शंका नाही.

॥ रामाय तस्मै नमः ॥ ●


# श्रीसाईलीला

खास श्रीदत्तगुरु अंक – सचित्र

१ जुलै १९७७ रोजी थाटात प्रसिध्द होणार

# प्रभाते मनीं राम चिंतीत जावा

• सदानंद चेंद्वणकर

चैत्र शुक्ल नवमी हा दिवस रामनवमी म्हणून साऱ्या भारतात अतीव उत्साहाने साजरा केला जातो. सुमारे आठ लाख वर्षापूर्वी या तिथीस सत्य सदाचार आणि धर्माचे प्रतीक मर्यादा पुरुषोत्तम भगवान रामचंद्र इक्ष्वाकु वंशात कौसल्या मातेच्या पोटी अधर्माचा नाश करण्याकरिता म्हणून आर्यावर्तात जन्मास आले आणि त्यांनी आपल्या कर्तृत्वाने सारी पृथ्वी पवित्र करून टाकली व रामराज्याची निर्मिती केली. रामजन्मापासून तो आजपर्यंत व यापुढेही आमच्या भारतीय इतिहासाचा सारा गौरव 'राम' या दोन अक्षरात समाविष्ट झालेला आहे. रामाची संपूर्ण कथा ही भारतीय साहित्याच्या उत्कर्षास सदैव प्रेरणा देणारी असून रामाचे जीवन हे भारतीयांचे आदर्श जीवन म्हणून जगात सर्वत्र गौरविले जाते.

## अमोघ शक्ति

रामनामात अमोघ शक्ति आहे. प्रत्येक संकटप्रसंगी रामनामस्मरण हे संकट मुक्त करणारी सर्वात मोठी शक्ति आहे अशी खात्री आहे. मन आणि आत्मा यांचे शुद्धीकरण रामनाम रामबाण परिणाम घडवून आणते. आमचे महात्मा गांधी तर रामाचे अनन्य भक्त होते- आपल्या प्रत्येक प्रार्थनेत ते रामस्मरण करीत असत. सन्मार्गाचे दर्शन या महान मंत्रामुळे होते व आत्मा आणि शरीर सतत निरोगी रहाते असे ते म्हणत. परलोकी गमन करताना सुद्धा ते रामनामाचा जप करीत गेले. आदि कवी महर्षी वाल्मिकीने अत्यंत रोचक शब्दात सर्वप्रथम रामायणाची रचना केली असली तरी जगातील बहुतेक सर्व भाषांतून दशरथी राम, जनकसुता वैदेही (सीता), सुमित्रा पुत्र लक्ष्मण व दशानन रावण यांच्या संबंधीच्या मानवी हृदयास चिरंतन आकर्षित करणाऱ्या आदर्श व बोध प्रद कथा लिहिल्या गेल्या असून रामनामाचा अगाध महिमा वर्णिलेला आहे.

भारताचा मिसर देशाशी प्राचीन कालापासून संबंध असल्याने तिथे इश्वाकु वंशातील राजा राज्य करीत होता असा उल्लेख सापडतो. युरोपियन इतिहासकारांनी या वंशास 'हिक्सास' असे म्हटलेले आहे. या कुळातील राजांना गोपालनाचा मोठा शौक होता व ते घोडेस्वारीत मोठे तरबेज होते. या मिसर देशाच्या साहित्यात 'रामसेस' असा रघुवीराचा उल्लेख असून रामपूजा अजूनही तिथे प्रचलित आहे.

बौद्ध साहित्यात 'अनामकम जातकम' 'दशरथ कथानम' व 'दशरथ जातक' या मोठ्या तीन ग्रंथातून रामकथा लिहिली गेली आहे. इसवी सनाच्या तिसऱ्या शतकात 'अनामकम जातकम' चा चिनी भाषेत अनुवाद झाला तो अद्यापपर्यंत चिनी त्रिपिटकात जतन करून ठेवण्यात आलेला आहे परंतु त्यामध्ये रामचंद्रास सावत्र आईमुळे

वनवास घडला असे म्हटलेले नसून स्वमातेची आज्ञा ऐकून रामाने स्वतः राज्यत्याग केला असे वर्णिलेले आहे.

जैन साहित्यात राम, लक्ष्मण व रावण यात्रयींची जैन धर्मातील त्रिषष्ठी महापुरुषात गणना केलेली आहे. त्यांच्या रामकथेनुसार वानर राक्षस हे विद्याधर वंशातील आहेत असे म्हटलेले आहे. चिनी भाषेत "की–कि अ–मे–" या नावाने रामायण उपलब्ध आहे. त्यात रामाचा वनवास व पुनरपि आगमनाचे वर्णन असले तरी सीताहरण व युद्धादि प्रसंगाचे वर्णन मात्र नाही. या रामायणात दशरथ राजास 'च–उ–चे' रामास 'लो–मो व लक्ष्मणास ' लो–मन' अशी मोठी गंमतीदार नांवे दिली गेली आहेत. या रामायणाचा रचनाकाल इ. स. ४७२ हा आहे. तिबेटी भाषेत इ. स. ७०० ते ९०० या दरम्यान बालकांडापासून तो उत्तरकांडापर्यंत रामायण लिहिले गेले आहे, व त्यामधील कथाही भारतीय रामायणाशी मिळती जुळती आहे. कंबोडियातील सहाव्या शतकातील प्राप्त शिलालेखाच्या आधारे तेथील मंदिरातून रामकथेचा खूप प्रचार नि रामपूजेचा प्रसार होता असे दिसून येते.

तिबेटी रामायणातून लक्ष्मणास 'रेष्म' किंवा 'रिष्म व सीतेस 'सित' किंवा 'जित' तर काही ठिकाणी 'सीज्स' व 'सीयस' असे संबोधले असून 'लफष ' नामक एका वानर मादीने सीताहरणाची त्रिवं बातमी सर्वात प्रथम रामचंद्रजीना दिली असा उल्लेख आहे. त्या कथेत सुग्रीवाच्या भावाचे नाव वाली नसून 'नण्ड" असे आहे. या नण्डाने रावण महालात सीताशोधार्थ प्रयत्न केला व रावणाच्या बायकोबरोबर वार्तालाप सुरू केला. रावणास हे पसंत न पडून त्याने रामाच्या भालप्रदेशावर लत्ताप्रहार केला व त्यासरशी रामास मूर्छा आली. रामाची ती शोचनीय अवस्था बघून समस्त वानरवृन्द शोकाकुल झाला व त्यांनी जीवक नामक एका वैद्याकडे रामास स्वास्थ्य लाभ प्राप्त करून देण्यासंबन्धी अजिजीने प्रार्थना केली. जीवकानें सुपिया नामक पर्वतावरून अमृत-संजीवनी आणण्यास सांगितले व ती कामगिरी याच नण्डाकडे सोपविण्यात आली होती. परंतु जाता जाता अमृतवल्लीचे नाव तो विसरला. शेवटी त्याने सुपिया पर्वतच्या पर्वत उचलून आणला व आपली कामगिरी उत्कृष्ट प्रकारे बजावली अशी मोठी मजेदार कथा आहे. या तिबेटी रामायणात दशरथ-परशुराम युद्धाचा उल्लेख नाही. अत्यंत जुन्या तिबेटी रामायणात सीतेस दशग्रीव पुत्री असे संबोधले आहे. 'पद्मावरिय' या जैन ग्रंथातहि असाच उल्लेख सापडतो.

सयाम हा बौद्धांचा देश असला तरी तेथील संस्कृतिक जीवनात रामायणाची कथा खूपच खोलवर गेली आहे. तेथील साहित्य, शिल्प व रंगभूमी या सर्व ठिकाणी राम-कथेचा खूपच प्रभाव पडलेला दिसून येतो. सयामी भाषेत रामायणास 'रामकीन' (रामकिर्ती) असे म्हणतात व त्यातून सीतेस 'सीडा' व रावणास 'ध्वसकंध' अशा

नावाने संबोधले जाते, समस्त सयामवर सत्ता चालविणारा राजा खमंगे हा रामभक्त होता. त्याने १२७५ ते १३११ पर्यंत राज्य केले. या राजाच्या नंतरच नव्हे तर ह्या· पूर्वीही होऊन गेलेल्या राजवंशाशी 'राम' हा शब्द निगडीत असायचा. राजा आपल्या नावाबरोबर 'राम' या शब्दाचा अवश्य उपयोग करी. जसे महाव्रत बुद्ध राम, महा- मंतक राम, सुखदेवराम याप्रमाणे. रामायणाचा सयाममध्ये प्रचार यवद्रिय (जावा) व कंबोडियांमधून झाला असावा. बँकॉक शहरातील जुन्या देवळातून राजवाड्यातून, रामायण कथेतील विविध चित्रे खोदलेली असून ती सर्व रामायणाच्या सयामी संस्कर- णास अनुसरून काढलेली आहेत. मलायी साहित्यात रामगाथा 'हिकायते–सेरि·राम' या स्वरूपात मिळते. जावा, बाली येथे सणासुदीच्या प्रसंगी रामलीलेचा कार्यक्रम अवश्य करण्यात येतो.

अमेरिकेसारख्या दूरच्या देशातही राम पूजा व रामकथेचा भरपूर प्रचार अजु- नही आहे हे वाचून तुम्हास आश्चर्य वाटेल. दक्षिण अमेरिकेतील आदि- वासी 'राम-सीत्वा' नावाचा एक सण अजूनही साजरा करतात त्याप्रसंगी अगदी रामा- सारख्याच एका मूर्तीची महापूजा केली जाते. पेरु देशातील कित्येक जुन्या कवितावर रामायणाची व महाभारताची छाप आहे. होमर या विश्वविख्यात कवीने लिहिलेले 'इलियड' हे खण्डकाव्य तर सर्वस्वी रामायणावरच आधारलेले आहे असा एक अलि- कडील वाद आहे. रामायणातील सर्व प्रसंग या इलियडमध्ये आहेत हे अभ्यासता सहज दिसून येईल.

जळी, स्थळी, काष्ठी, पाषाणी सर्वत्र राम आहे असें आमच्या सर्व संत कवींनी वेळोवेळी वर्णिलेले आहे. संत रामदासांप्रमाणे संत तुलसीदास हा अनन्य रामभक्त होता. हिंदीत रामायणाची रचना तुलसीने केली. तामीळ भाषेत कंबन नावाच्या संत कवीने तुलसीप्रमाणेच स्वतंत्रपणे रामायणाची रचना केली आहे. राम हा ईश्वराचा साक्षात अवतार आहे याद्दष्टीने तुलसीने रामगाथा गायिलीं आहे. कंबनने पण राम हा प्रत्यक्ष परमेश्वर आहे. भूतलावरील जनतेची सुखदु:खे भोगण्यासाठी तो रामाच्या स्वरूपात प्रकट झाला आहे अशा भावनेने रामचरित्र लिहिले आहे. ख्यातनाम राष्ट्रकवी मैथिलीं शरण गुप्त इतके रामभक्त होते की त्यांनी रामपदकमलावर आपली काव्यधारा वाहवून प्रभु रामचंद्राच्या प्रती आपले अनन्य साधारण प्रेम व्यक्त केले आहे. हृषिकेषचे ख्यात- नाम स्वामी शिवानंद महाराज यांच्या कथनानुसार रामायण ही एक अद्दश्य शक्ति आहे. रामाचे स्मरण करणारा क्रोध, मद, मोह, मत्सर, लोभ इ. वर सहज विजय मिळवितो. आपल्या एका सायंप्रार्थनेत गांधीजीनी रामनामाचा उच्चार करून हनुमंताने पर्वतही उचलला, पत्थरसुद्धा पाण्यात तरंगू लागले, अहिल्येचा उद्धार झाला, ध्रुव, प्रल्हाद वाल्मिकी इ. शी निगडीत असलेले रामनाम मनापासून प्रत्येकाने घ्यावे.' असे सांगितले आहे.

# सकळ जगाचा निजविश्राम–श्री साईराम

डॉ. के. भ. गव्हाणकर.
इंदिरा निवास, आग्रारोड कुर्ला - ७०

सुत दशरथाचा राम हा कालचा ।
अनादि कालाचा आत्माराम ।। तु. म. ।।

● संत चुडामणी श्रीसाईबाबांनी श्री रामजन्माची प्रथा आपल्या ह्यातीतच शिरडी ग्रामी पाडली, व कै. संत दासगणुमहाराज यांच्या गळयात श्रीरामजन्मकीर्तनाची माळ घातली. हा रामजन्म त्यांच्याकडेच चालू आहे.

संत देव-अवताराकडे कोण दृष्टीने पहातात व पहावयाला आपणाला शिकवतात हे आपण नित्य ध्यानी ठेवले पाहिजे. कर्माकडून देव पाहू गेल्यास देवाचे खरे रूप संतरूपाप्रमाणेच आपणाला कळण्यासारखे नाही; त्यासाठी त्यांनी देवाचे खरे रूप म्हणजे तत्वतः रूप काय आहे याची वारंवार जागृति दिली आहे. श्री नाथांनी भावार्थरामायण हा अतिसुंदर महान ग्रंथ लिहीला त्यात पदोपदी रामरायाच्या तत्वतः सुंदर असलेल्या रूपाची मांडणी केली आहे आणि मग ते प्रभुत्व साकार इंद्रियातून खेळत असलेले कथेतून दाखविले आहे. श्रीरामजन्म प्रतिवर्षी आपण करीत असतो तो केवळ स्मरण मात्र नाही, तर आपल्या जीवनात तो सतत नांदत असतो त्याप्रमाणे उघड पहावा त्यासाठी त्याचे गुणगान करीत असतो. त्या प्रभुरायाची पुराणाप्रमाणे नुसती अचाट कर्मे आपण वर्णन करू लागलो अगर पाहू लागलो तर त्या अद्‌भुत कर्माबरोबर रामरायाच्या गुणकर्मात पुष्कळसे दोषही दिसू लागतील. श्रीरामरायांनी रामराज्य स्थापन केले असे कर्मावरून पाहू लागलो तर त्यांच्या अवतारात सीतेसारख्या साध्वीला वनात सोडल्याचा व शंबूक (शूद्र) तप करू लागला म्हणून त्याचा वध केल्याचा दोषहि त्यांना देण्याचा प्रसंग येणार आणि शिवाय सर्वात प्रभूरूपाला बाधक अशी गोष्ट आपणाला ध्यानी घ्यावी लागेल ती ही की ज्याला आपण वारंवार प्रभु, प्रभु, म्हणतो तो कर्मावरून (कथावरून) पाहिले तर तो पूर्वी केव्हातरी होता आणि होता तो आज नाही तो वैकुंठाला गेला व तो नसताना आपणच तेवढे त्याशिवाय उरलो असे वाटणार आहे. त्यासाठी श्री संत देवाला संतस्वरूपाप्रमाणेच केवळ कर्मरूप पहात नाहीत. त्याचे अखंड रूप जीवात सतत जसे नांदत आहे ते प्रथम स्पष्ट करितात व नंतर तेच, प्रभूरूप कर्मात आता व सर्वकाळ कसे नांदत आहे हे उघड करितात. त्याच दृष्टीने श्रीसंत तुकोबाराय रामरायाच्या रूपाबद्दल लिहितात,—

सुत दशरथाचा राम हा कालचा! अनादिकालाचा आत्माराम ।। रामायण-पुराणातला राम तुम्हाला पहावयाचा असला तर तो राम राजा दशरथ या देहधारी व मृत अशा जीवाचा पुत्र म्हणावा लागेल व तो एकेकाळी होता. आता नाही असे मानावे लागेल. त्यात जीवाला अखंड सांगाति असलेल्या प्रभु भेटणार नाही, तसा असल्याबद्दल ओळखता येणार नाही. म्हणून संत तुकोबाराय त्याच चरणाच्या पुढल्या भागात सांगतात 'अनादि कालाचा आत्माराम'–राम प्रभुला आत्माराम म्हणून पहाल तर तो केव्हाही जीवाला सोडून गेलाच नाही असे प्रत्येकाच्या अनुभवाला येईल, आणि त्याच दृष्टीने प्रभु म्हणून त्याला पाहिले असे होईल. आत्माराम रमविणारा आत्मा जीवनात प्रत्येकाचे ( कल्पनेचे, कर्माचे ) रमणीयत्व वाढविणारे ज्ञानानंद प्रेमरूप हेच खरे रामरूप होय, तेच रूप दशरथाच्या पोटी जन्मले. ते त्यावेळी होते तसेच आताही आपल्या इंद्रियात नांदतच आहे असे स्पष्ट दिसेल ज्ञानेश्वरमाऊली म्हणते' तैसा हृदयामध्ये मी रामु । असतां सर्व सुखांचा आरामु ।। सर्व सुखांच्या आराम राम मी सर्वांच्या हृदयात आहे. या रामरूपाकडे सर्व सुखाचा आराम, प्रियतेकडे आपण पाहिल्यावर आपणाला सतत ते रमणीय रूपच भेटणार आहे. सर्व सुखांचा आराम सुखातले सुखरूपत्व, बरे वाटणारे रूप जीवनाची गोडी, प्रत्येक कल्पनेबरोबर उसळून येणारा आनंद, जगताकडे ( म्हणजे हृदयकर्माकडे ) पाहताना उल्हास देणारे नेत्राच्या तेजाला गोडीचे पाणी ढाळणारे सुखसंवेदन, हे श्रीसाईरामाचे रूप आहे ते तसे सतेज रमणीय रूप होते. ते सतत जीवामध्ये प्रगट होत आहे. हेच श्री जानकीदेवीला म्हणजे जीवप्रतीतीला वेध लावणारे रूप नव्हे का ?

श्री नाथराम त्या प्रभू रुपा बद्दल भावार्थरामायणामध्ये काय लिहितात ते पाहू या.

" जो सकळ जगाचा निजविश्राम । सकळ सुखाचा आराम । जो निष्कामाचा पूर्ण काम । तो राम दशरथात्मज ।। श्रीनाथरायांनी निजविश्राम हा शब्द घालून जीवाचे जे निजत्व ( आपले पणाचे अखंड बरवे रूप ) तिकडे लक्ष नेले आहे. जो निष्कामाचा पूर्ण काम निष्काम असण्याची जी प्रीती त्यात जे गोड वाटते असा सकाम–प्रिय वाटविणारा असा जीवसखा प्रभुराया तो दशरथात्मज म्हणा हं ! या रूपा खेरीज त्याला वेगळा असा पाहू नका; असा पाहिला म्हणजे मग तुम्हाला स्पष्ट असे दिसेल की तो आपल्या जीवात सतत नांदत आहे. तो त्या दशरथच्या पोटी जन्मलेला असे वाटले की, तो कितीही मोठा, कृपावंत प्रभुशक्तीचा वाटला तरी परका, वेगळा असेच वाटेल. तो जीवांचा जिव्हाळा आहे असे वाटले म्हणजे त्याला केव्हाही दूर जा, दूर सारू म्हटले तरी तो जवळचा हटणार नाही. दृष्टीचा डोळा होऊन अखंड म्हणजे प्रत्येक कर्मात तो आपले रमणीय रूपच भेटवील. त्या श्री रामरायाचे रूप संत कसे रेखाटतात हे त्यांच्याच शब्दात पाहू या.

त्या श्रीरामाची निजस्थिति । चिन्मात्रैकचैतन्यमूर्ति । अव्यक्त आलासे व्यक्ती । भक्त भावार्थी साकार । तेंचि स्वरूप स्वभावेंसी आले साकार दशेसी । सगुण मूर्ती भासे

कैसी । चिद्विलासी श्रीराम ॥ श्रीराम कौसल्येच्या उदरीं का । तो सबाह्य अंतरी । राम परमात्मा चराचरीं । तो दशरथा घरीं अवतार ॥ श्रीरामाचे पूर्णपण । सीतासती जाणे संपूर्ण । या लागीं त्याचे सगुणपण । पाहे आपण सर्वावयवीं ॥ आकाशाची बांधितां मोट । कर्त्याचे व्यर्थ जाती कष्ट । करिता शब्दाची खटपट । श्रीराम स्पष्ट न बोलवे ॥ राम सगुण तोचि निर्गुण । राम परमात्मा परिपूर्ण । राम चिन्मात्रैक चैतन्यघन । जगज्जीवन श्रीराम ॥ राम निर्मळत्वें परम । हे सुखरां न कळे वर्म । अंगी बिंबले देखोनिया व्योम । राम मेघश्याम म्हणताती ॥ श्रीराम हृदयींचा अवकाश घनानंदें निरवकाश । संत जडले सावकाश । त्यासी नाश नाहीं कल्पांती ॥ समाधीचे सोलीव सुख । तेंचि रामहृदयींचे पदक । संत माणकुळीं अनेक । जडले देख सत्कोंदणे । अनन्य भावाच्या सत्प्रीती । रूळे तेथे वैजयंती । सुमनमनाच्या रघुपति । माळा शोभती सहित तुळशी ॥ देखतां श्रीरामाचे श्रीमुख । समूळ निर्दळे जन्मदुःख । परमानंदें कोंदे सुख । हरिख वोसंडे ॥ श्रीरामाचेंनि प्राणे जाण । जगाचे विचरती प्राण । तेथें वसतां समाधान । निजजीवन वायूसी ॥ चैतन्याचे विश्रांति स्थान । तेचि श्रीरामाचे श्रीनयन । सबाह्य डोळस संपूर्ण । आपणा आपण देखणे ॥ भावार्थ रामायण बालकांड अ. १९.

हे वर्णन वाचताना आपणाला कोणते रूप ध्यानी येते ? भक्तासाठी व्यक्त झालेला तो चिन्मात्र प्रभु आहे. तो कौसल्येच्या उदरी जन्मलेला दिसतो खरा, म्हणजे तो आकार घेणारा पण सबाह्य—आतबाहेर प्रत्येकामध्ये तो आहे. राम चैतन्य रूप आहे. तो निर्गुण असून सगुण आहे—सगुणरूपात चैतन्यरूप हेच निर्गुणत्व होय. जगाचे जीवन ते सर्वसुखांचे सोलीव सुख आहे. त्या सुखाचे पदक रामहृदयी असून संतरूपी सुन्दर छोटी माणके (माणुकली) त्याला लिगटली आहे. ते सुख पहाताच सर्व दुःख समूळ हटते, कारण परमानंद तेथे दाटतो. त्याच्याने: सर्वांचे प्राण चालतात. तोच सर्वांचे विश्रांतिस्थान व परमभाग्य आहे. केवळ शब्दांनी ते रूप संपूर्ण स्पष्ट होणारे नसून या शब्दांनी जे चैतन्य येईल, त्यात जे सुखरमणीयत्व प्रगट होईल. त्यातच त्या रामायणाचे रूप जीवनात स्पष्ट होणार आहे. हा प्रभु आपण जीवितात असा स्पष्ट पाहिल्यानंतरच त्याचे खरे गुणगान म्हणजे त्याचे प्रेम आपणास भोगता येणार आहे.

प्रभुला त्याच्या या सत्य स्वरूपात: कोणी पाहिला आहे का ? कुणी त्याला आकारातच केवळ पहातात, त्याची कर्मेंच केवळ देखताच, कोणी त्याला निराभास व्यापक मानतात. त्या सर्वांची श्रीनाथरायांनी फार सुन्दर हजेरी घेतली आहे. संतवचनानीं श्रीहरीला पाहणे फार सुखदायक असते. त्यांच्या प्रीतीचा, बोधाचा सारा सुगंध त्यात दरवळत असतो. श्रीरामराया जानकीमातेसह अयोध्या नगरीत जीवप्रतीतीत प्रवेश करीत आहेत. त्यावेळी त्यांना कोणी कोणी कसे पाहिले ?

श्रीराम पहावा पडिकरीं । एक चढली परेच्या उपरी । एक चढोनि या गोपुरीं । एक जनाभीतरीं राम पहाती ॥ हा नव्हे तो पैल तो तो । ऐसें देखणे जो दावितो ।

तोचि अनुभव एक होतो । पाहणे पाहवितो श्रीराम ।। एक चढोनि जीवाचे माथां । सादरें पाहति श्रीरघुनाथा । एक सांडोनी जीव भावना । श्री रघुनाथा भेटती ।। एक प्रेमाचेनि पडिपाडें । आनंद नाचती रामापुढें । एक ते अत्यंत निधडे पाहति चहूंकडे श्रीराम ।। एकते श्रीराम सांगाती । एकासी श्रीराम नित्यगती । एक श्रीरामाच्या निजस्थितीं स्वये वर्तती सर्वदा ।। भावार्थ रामायण बालकांड अ. २७.

हा नव्हे तो पैल म्हणून पहाणारी वेदश्रुति, प्रेमाचेनि पाडे पहाणारे भक्त आणि जनामध्ये पहाणारे इतर या सर्व जीववृत्तींचे, श्री नाथांनी किती सुंदर वर्णन केले आहे ! आता या साधक व भक्तदर्शनाशिवाय आणखी धर्मकर्मठ लोकांना प्रभुरामराया कसे दिसले याचे श्रीनाथांनी मार्मिक वर्णन केले आहे.

श्रोत्रीं स्वयंपाकी केवळ । श्रीराम पहाता होय विटाळ । आधणीं टाकावया तांदुळ । चाट्ट तात्काळ विसरले ।। ( चाट्ट = बडबड करणारे ) आम्ही उत्तम आश्रमवासी । श्रीराम जातो जनप्रदेशीं । पहातां स्पर्श होईल आम्हासी । दुरून संन्यासी पाहू म्हणती ।।

कर्माच्या व वर्णाच्या अभिमानाने देव सोवळ्या ओवळयात पहाणारे हे प्रभुपासून दूर कसे असतात हे श्रीनाथांनी दाखविले आहे त्याबद्दल ते लिहितात.

'श्रोत्री स्वयंपाकी संन्यासी । हे निजमाहेर विटांळसी । त्यामाजी तो सदा मुसमुसी देखितां जगासी अपवित्र ।।

आश्रम कर्मा कर्माच्या अभिमान्यांना आणखी एक विरोधी उदाहरणाने नाथांनी चांगलाच झटका दिला आहे.

मार्गी अनुलक्षोनी श्रीरामासी । पिंगळा वेश्या थांबे उल्हासी । मार्गी झगटली संन्याशासी । हे लक्ष तिसी असेना । मज का झगटली ही रांड । रागें संन्यासी ठोके दंड । येरी पहाता श्रीरामाचे तोंड । दंड उदंड सुखी झाली ।।

वेश्येने उल्हासाने प्रभु पाहिला. त्या सुखात तिने संन्याशाचा दंडही आनंदाने सोसला. सर्व वृत्तींचा न्यास केलेले संन्यासी मात्र भडकले. वेश्येचा–श्रीराम पहाता विटाळ उडे । तो विटाळ संन्यासामाजी दडे । म्हणोनी विटाळाचे सांकडे । संन्याशाकडे सर्वदा ।।

श्री नाथासारखे शास्त्रपारंगत ब्राम्हण व संत हे शब्द उगाच लिहितात असे आपणाला म्हणता येईल का ? असो.

साऱ्या विश्वानें आपापल्यापरी प्रभुला पाहिला व अनुभवला. सीतामाईने तो प्रभु कसा ओळखला ? तसा जीवमात्रांनी, भक्तजनांनी प्रभुला पाहिला पाहिजे; प्रभुही जीवाला तसाच पहातो.

श्रीरामाच्या मनोगता । अनुकूल वर्ते सीता । सीतेचिया मनोरथा । परिपूर्णता श्री रामे ।। सीतेचा भाव श्रीरामी पूर्ण । राम सीतेसी संपूर्ण । सीता रामे सुखसंपन्न । सुखी

रघुनंदन सीतेचेनि । श्रीरामे सीता सुंदर पूर्ण । सीतेने राम शोभे सगुण । श्रीरामें सीता सुलक्षण । सीतेचेनि लक्षलक्षण श्रीरामा ।। सीता वचन श्रीरामा वचनार्थ । सीता पद श्रीराम पदार्थ । सीता मुक्ति श्रीराम मुक्त्यर्थ । परमस्वार्थ येर येरा । येर येरां वेगळेपण । होऊ न शकती अर्धक्षण । अणुमाजी दोघेजण । नांदती पूर्ण पूर्णत्वें ।। सीता भाव धरी अधिकाधिक । तंव तंव श्रीरामीं ओसंडे सुख । कैसीं अतिप्रीति अलोलिका । एक एका अनन्य ।।

हे सारे वर्णन वाचल्यावर ते प्रतितिरूप जीव त्या जीवाचा प्यारा प्रत्यय प्रेमप्रभु यांचेच भक्तीबोधाने व्यक्त होणारे रूपाचेच वर्णन आहे हे कुणालाही कळेल.

रामराया जीवमात्रामध्ये कसा आहे व जगत् त्यांच्याकडे किती विविध दृष्टीने पहाते व आपण भक्तहृदयाने त्याला कसा भोगावयाचा हे श्रीनाथरायांनी रामायणात व श्री संतांनी आपल्या वचनात स्पष्ट केले आहे. प्रभुला असा जीवितात पहिला अनुभवला म्हणजेच त्याला साच पाहिले असे होते. नाहीतर प्रभु न भेटता एक विशिष्ट कर्मरूप दिसते. प्रभु यथार्थ पाहिला नाहीतर त्याचा बोध भलताच राहील व त्याची उपासना, भजन घडणार नाही. प्रभुचे नाम किती गोड आहे हे त्याला स्वजीवितात पाहिल्याखेरीज उमगणार नाही. त्याला पाहिल्यावर त्याचे नाम (म्हणजे स्मरण) गोड कसे आहे, किती आहे व ते सतत घ्यावेसे वाटेल कसे हे वेगळे सांगावे लागणार नाही. हाच खरा प्रभु श्री रामरायाचा नित्य नवा जन्म होय.

# श्रीसाईरामाची रामकथा

● श्री. चकोर आजगांवकर
वाय. ११/१६९ गव्हरमेंट कार्टर्स, वांद्रा–५१

[* राममय झालेल्या भारतवर्षात रामजन्माबरोबरच रामकथेची चैत्रपालवी फुटते. श्रीरामाचे गुणचरित्र घरोघर गायिले जाते. रामनवमीला श्रीसाईरामाच्या अध्यात्म अयोध्येत (म्हणजे शिरडीत) रामजन्माचा महोत्सव सुरू होतो. पूर्वावतारात श्रीसाईबाबा रामभक्त कबीर होते. पंथजातिभेदातीत धर्माचा झेंडा उंचावताना कबीरांनी रामभक्तीचा पंचमस्वर खाली पडू दिला नाही. श्रीसाईबाबांनी शिर्डीत ६४ वर्षापूर्वी रामजन्मोत्सव स्वहस्ते सुरू केला. तेव्हापासून आजवर तो अव्याहत चालू

**आहे. साईबाबांचा जन्म फाल्गुन शुद्ध नवमीस झाला. परंतु चैत्र शुद्ध नवमी हीच साईरामाने प्रभु अवतरणाची उत्सव तिथी म्हणून आदरिली त्या निमित्ताने हे साईरामाचे भक्तिरामायण सादर करीत आहे. * ]**

प्रत्येक युगात धर्मसंस्थानेसाठी श्रीनारायणाची वैष्णवशक्ति अवतरते. १९ व्या शतकाच्या मध्यावरहि प्रभूचे अवतरण झाले. या प्रेमाविष्काराला जगाने " साईबाबा " या नावाने ओळखले.

**" जे शरयूच्या तटी उमटले । कालिंदीच्या कुशीत रमले ।**
**दिव्य चरण ते पुनरपि करिती शिरडीतून पुकार ॥ "**

गोदावरीच्या तीरावर श्रीसाईरूपाने श्रीहरि अवतरले.या दयामय कारुण्याने आपल्या धर्मजाती पंथाचा किंवा मातापितरांचा ठावठिकाणाहि मागे न ठेवता मानवता व समता धर्मासाठी नवा अवतार घेतला. पंधराव्या शतकातील कबीराचे अवतरण व १५१८मधील त्याचे प्राणप्रयाण हे श्रीबाबांच्या १९ व्या शतकातील अवतरणाशी आणि १९१८ मधील निर्वाणाशी अगदी समांतर आहे. अशी जीवनधारा समान तशी विचारधाराहि समांतर आहे.

**" यमुनावरोनी आला नवीन वारा**
**श्रीरामरहिम दोघे सोत्कंठ मीलनाला "**

शिरडीच्या वेशीवर पाऊल ठेवताना खंडोबाच्या महाद्वारात श्रीबाबांनी म्हाळसापतींना उपदेश गाथा ऐकविली.

**" तो यवन न हिंदु—नसे धर्म बंदिस्त**
**रे जनक जगाचा—भेदशून्य निर्द्वंद्व**
**त्या धर्म नसे—नच पंथ, जात अज्ञात**
**का चैतन्याला चैतन्याविण जात ? "**

फकीराच्या कुटुंबात वाढलेल्या या सत्पुरुषाच्या अंगी अनेक धर्मांचे संस्कार एकत्र होते. पण त्यातूनहि वेदांताच्या विश्वधर्माची, मानवतेच्या मनोधर्माची आंतरिक साक्षात्काराची प्रकाशप्रभा ढगामागून झळकणाऱ्या सूर्याच्या प्रकाशकिरणासारखी सुस्पष्टपणे दृष्टिगोचर होत असे. " सर्वधर्मसंमीलन — पंथ हा कबीर " असे त्यांच्याच शब्दात सांगितल्यास अधिक स्पष्ट होईल. यामुळेच त्यांच्या वर्तनात लोकविलक्षण विरोधाभास आढळत असत. फकीरासारखे कफल्लक जिणे जगतानाहि अमीराला लाजवील असे सिद्धीवैभव त्यांचेपाशी होते. पायाशी लक्ष्मी असूनहि ते भिक्षान्नावर जगत. मशिदीत रहात पण तिचे त्यांनी मंदिर बनविले होते. अग्निवेदी, घंटा ही प्रतीके मशिदीला भूषवीत असत. ते एका जागी बसत, पण विश्वाला स्पर्श करीत. त्यांनी दिलेली

उदी जीवनाची अशाश्वती व मृत्युंजय अमर तत्वज्ञान याची एकाचवेळी स्मृती जागी करी. त्यांनी नयनदळें मिटली तरी ते अंतःचक्षूनी सर्व विश्व पाहू शकत. शांतिब्रह्म असून रुद्रावतारहि धारण करीत. त्यांनी ग्रंथ लिहिले नाहीत, प्रवचने दिली नाहीत. तरीहि त्यांच्या मौनात ज्ञानाचा सागर गर्जे. एकेक शब्द सारा वेदांत सांगून जाई. निश्वास वेद बनत.

पाण्याने पणत्या पेटवणे, मशिदीच्या आढ्यावर फाटक्या चिंध्यानी बांधलेल्या फळावर योगनिद्रा करणे, पंचमहाभूतावर सत्ता गाजविणे, धुनीत हात घालून हजारो मैलावरील अपघात टाळणे असे, असंख्य चमत्कार त्यांनी केले. त्यांचे दिव्य जीवन व अद्‌भुत चमत्कार शिरडीतील कणाकणावर स्मृतिगंध ठेवून गेले आहेत.

**" पुण्यवृक्षवर पावन वेली । पुण्यपथावर पावन धूली**
**घरोघरी मंगलता भरली । घरी मंदिरी मंगलतेचा एकच आविष्कार "**

श्रीबाबांची गुरुपरंपरा दिव्य होती. कुंडलिनीचा शक्तिपात योग हा त्यांच्या दृष्टी-पातयोगाहून निराळा मानावा लागतो. शक्तिपाताने आधुनिक गुरु अधःकुंडलिनी जाग-वतात. पण पैसा, कीर्ति, कांता व व्यक्तिगत स्वार्थ यांची लक्ष्मणरेषा न ओलांडणाऱ्या मनोमलीन साधकाच्या बाबतीत हा शक्तिपात फोलच ठरतो. श्री बाबांचा हा दृष्टीपात योग भक्तीरूप मध्य कुंडलिनी जागी करी. हृदयातील ज्योतीला आपल्या नयन ज्योतीने प्रज्वलित करी :—

**" नयनात आपुल्या नयन मिळो । प्रभु ज्योतीमधुनी ज्योत जळो "**

योगातील प्रेम भक्तिपाताने हृदयकमल उत्फुल्ल करणारी त्यांची दृष्टी ही वेधदृष्टी होती.

**" तुझा मीच अन् माझा तू हा भर हृदयी संदेश "**　　किंवा
**"कासविची ही दृष्टी प्रेमळ । दुरून पिलांचा करी सांभाळ ।**
**प्रेमवेध अद्‌भुत स्नेहाळ "**

असे या दृष्टीचे त्यांनी वर्णन केले आहे. श्रीगुरूच्या चरणी मन, बुद्धि, अहंकार, हृदय आणि आत्मा यांचे शरणागतीने समर्पण केल्यावरच शिष्य कृपेला पात्र होतो. यालाच ते श्रद्धा व सबुरी म्हणत. त्यांना पत्रपुष्पफलतोय या बाह्य उपचारांची गरज नव्हती. ते प्रेमाचे भुकेले होते :-

**"मी प्रेमचक्रवर्ती— सामंत दिव्य धाम**
**प्रेमार्त अंतरात—घे नित्य जन्म राम**

किंवा

**तुरियेच्या तटि यमुने निकटी लीलामय नटना रे**
**प्रेमबंधनी त्याला बांधा जन्ममरण हरणा रे"**

किंवा

**प्रीतीचा फुटला बांध। दरवळला परमळ गंध**
**तुटलेच भवाचे बंध। मी उरलो परिमानंद**

या शब्दात आर्त व समर्पणात्मक प्रीतीभक्तीचे गोडवे श्रीबाबांच्या शब्दातून महात्मता पावले आहेत. श्रीनारायणाची मधुर भागवत वैष्णव भक्ति, नाथांचा गुरुकृपा-योग यांचा मधुर संगम श्रीबाबांच्या तत्त्वज्ञानात आहे. अर्जुनाची सख्य भक्ति व उद्धवाची आर्तभक्ति यांचा प्रवाह श्रीबाबांना मान्य होता असे दिसते.

**'नित हरिच्या धरी छंदा। प्रभुचरणी हो बंदा**
**पौर्णिमेत भक्तीच्या नित्य तू न्हावे ''**

असे श्रीसाईबाबांनी दासगणूना उपदेशिले आहे. **'मत्स्वरुपी रत झाले। माझे पणि जे विरले। ते अनन्य भक्त मला प्राणाहून प्यार** 'असा दिलासा माधवराव देशपांडे ऊर्फ शामा यास श्रीसाईबाबांनी दिला होता. हृदयातभक्ति, बुद्धीत साक्षीभाव, कर्मात यज्ञमयता व अहंकारात परमेश्वरी अस्मिता बिंबवणे हा त्यांचा साधासोपा मार्ग होता. भगवंतावर अपार प्रेम, वृत्तींचे समर्पण, मानापमान ईषणा यांचे बलिदान यामुळेच तो प्रेम करुणामय प्रभु प्रसन्न होतो व सद्गुरुंची जोड करून देतो. अवधूत गुरुंची गाठ पडल्यावाचून ऊर्ध्वकुण्डलिनीचा मार्ग कुणालाहि सापडू शकणार नाही हे सांगताच ते स्वानुभावाचे ग्रंथन करतात :—

**"सुजन हो सहज समाधि खरी। गुरुकृपेने जागृत झाली अनुदिन सौख्य भरी**

या कृपासमाधीमुळे यमनियमाविण योग हाती येतो, प्रकाश पंथ सापडतो, अनाहतस्थ हरद्वारी येतो व अलख पुरुष पलखात खेळू लागतो. रोमारोमात आनंदाचे अनुभव रोमांचतात. **'तू अमृतस्पर्शी प्रसाद—करि विषादहि आल्हाद'** असा अनुभव स्फुरू लागतो. आनंदाला छंद फुटतात. प्रकाशवेल गगनावरी चढते. साधक मंडळीस श्रीबाबा सदैव स्नेहाळपणे सांगत,

**'नेत्रजडव तू माझ्या चरणी। चित्त बुडव तू माझ्या स्मरणी। विरवी प्रज्ञा माझ्या चिंतनी'** कारण श्रीगुरुस्वरूप बाबा हेच, मनोलय आहेत अनाहतध्वनि आहेत, आत्मज्योती आहेत. त्यांचा कर हाती धरल्यावर सच्चिदानंदाचा लाभ दूर राहील काय ? गुरु शिष्याची आध्यात्मिक एकता हाच नाथपंथाचा कृपामार्ग आहे. श्रीबाबा म्हणत 'तू मजकडे पहा. मी तुझ्याकडे पाहीन. मंत्रतंत्र साधने नकोत. सफल साधकांचा सिद्धीसाठी तुम्हाला अखेर माझ्या अवधूत स्वरुपाकडेच वळावे लागेल. भक्ति, ज्ञान, कर्म आणि योग अवधूत कृपेच्या प्रेममार्गाशिवाय अपुरे आहेत यासाठी अवधूत कृपेसाठीच झटा. त्या प्रेमकृपेतून तुम्ही समाधीच्या माथ्यावरून सामरस्याची विश्वात्मक अवस्था अनुभवाल."

श्रीबाबांची प्राणज्योती एका भक्ताला वाचवण्यासाठी स्वतः चंद्रज्योतीत मिळाली. विजयादशमीस १९१८ साली बाबांनी देहाच्या सीमा ओलांडल्या. तरीहि आजहि या साईरामाची कृपा तशीच अखंड बरसत आहे. अजूनहि दुःखितांची आसवे पुसली जातात. तो प्रेमाचा हात अजूनहि मस्तकावर फिरतो.

**'हा न जन्मतो, विलया जातो । दिक्कालांना अतीत उरतो**
**प्रेमरसाचा याच्या अठरा भुवनांना आधार ! ।**

प्रतीवर्षी रामनवमी येईल. श्रीसाईरामाची रामकथा ही भक्तिगाथा शिरडीतून सर्वत्र दुमदुमत राहील आणि भक्तभाविक म्हणत रहातील–

**'प्रभो,'' घ्या चरणीं लाख प्रणाम**
**शरणागत मी केवळ अपुला बंदा एक अनाथ**

● (चकोर आजगांवकरलिखित **'श्रीसाईगीतायन'** या गीतकाव्यावर आधारित जीवनपरिचय )


# – श्रीसाईलीला –

मे अंकाचे खास आकर्षण

- 'शिर्डीके साईबाबा' या चित्रपटात श्रीसाईबाबांची भूमिका वठविणारे श्री. सुधीर दळवी यांची सदानंद चेंदवणकरांनी घेतलेली गाठभेट
- अभिनेत्री रत्नमाला पंडीत यांची साईभक्ती
- श्रीसाईबाबांना प्रत्यक्ष पाहिलेले, त्यांचा प्रत्यक्ष सहवास लाभलेले अहमदनगरचे सुविख्यात शिक्षणतज्ञ श्री. गणेशपंत चितांबर यांचा खास लेख – माझे शिर्डीतील लहानपण

या शिवाय श्रीसाई विषयक भरपूर साहित्य अनेक भावपूर्ण श्रीसाई गीते

वार्षिक वर्गणी :– ६ रु. किरकोळ अंक ६०–पैसे

# मानव उन्नतिचे सोपान
# रामायण

● डॉ. अनिल जायस्वाल,
द्वारा श्रीसाई क्लिनिक,
चितार ओळ, नागपूर–२

वाचकांनो !

श्रीरामासारखा पुत्र नाही
वसिष्ठासारखा गुरु नाही
दशरथासारखा वडिल नाही
कौशल्यासारखी माता नाही
व तसेच श्रीरामासारखा पती दुर्लभ आहे.
सीतामाईसारखी पत्नी दुर्लभ आहे.
लक्ष्मण व भरतसारखे बंधु दुर्लभ आहे
तर रावणासारखा शत्रुही दुर्लभ म्हणायचा,

'रामायणाचे प्रत्येक पात्र आदर्शमय व जनसामान्याच्या हितास्तव अनुकरणीय असे आहे. मातृप्रेम, पितृप्रेम पुत्रप्रेम, भ्रातृप्रेम, पतिप्रेम व पत्नीप्रेमाचे सर्वोच्च आदर्श जर कोणा एका ग्रंथात पाहवयास मिळतात तर तो ग्रंथ 'रामायण' हाच आहे.

श्रीरामचरित्र मार्गदर्शक आहे. रामायणाद्वारे अनेकाना लाभ झालेला आहे, व होत आहे. 'आपले मन कसे आहे ?' हे पाहवयाचे असल्यास रामायण वाचा. त्यात आपणास आपल्या मनाची पात्रता व स्थिती पाहवयास मिळेल रामायण हे मनोमालीन्याचे दर्पण आहे. आपण आपल्या अमूल्य जीवनाचे बहुतांशी क्षण केवळ निद्रा व आळशीपणात गमवितो. तोच कुंभकर्ण आहे. कामभावाने परस्त्रीविषयी चिंतन करणाराच रावण आहे. रावण अर्थात काम. कामच आपणास रडवित असतो व जो रडवितो तोच रावण.

परमानंदात हेलकावे देणारेच श्रीराम आहेत. वाचकांनो ! आपणा सर्वांस विदित आहेच की रामायण हा महाग्रंथ सात खंडात विभागला गेला आहे. या प्रत्येकास

दिलेल्या वेगवेगळ्या नावामागेही आध्यात्मिक रहस्य दडपलेले असल्याचा आपणास बोध होतो. त्याच रहस्याचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न–आपल्या अल्पमतीनुसार लेखकाने श्रीसाईसमर्थांच्या चरणी अर्पित करण्यास–केलेला आहे. रामायणातील हे सातकांड–एका अर्थाने–मानव जीवनाच्या उन्नतीचे साधनच आहेत. ते पूर्णतः अनुकरणीय व अवलंबनीय आहेत. या सर्वांस मानववृत्तीचे सोपानच म्हणायचे.

सर्वप्रथम **बालकांड** आहे.

बालकाप्रमाणे निर्दोष व्हाल तेव्हाच श्रीरामास आवडाल. बालक निरभिमानी असतो म्हणून तो ईश्वरास आवडतो. बालक ईश्वरास सदासर्वदा प्रिय आहे; कारण त्यात अहंभाव नाही. छळकपट नाही. विद्या, धन, वैभव व प्रतिष्ठा वाढल्यावरही आपले हृदय सदैव बालकाप्रमाणे निर्दोष व सरळ असावयास पाहिजे. श्रीरामायणाचे बालकांड म्हणजेच निर्दोषकांड आहे. श्रीराम कोणास मिळतात ? तर ज्याचे जीवन बालकाप्रमाणे निर्दोष आहे त्यालाच. करीता बालकाप्रमाणे निर्दोष व निर्विकारी बनण्याचा आपण सर्वांनी प्रयत्न केला पाहिजे. कोणताही दोष डोळ्याद्वारेच मनात प्रविष्ट होत असतो. करीता दृष्टीवर सदैव अंकुश असू द्या. तसे केल्यावरच जीवन निर्दोष ठेवणे शक्य आहे जशी दृष्टी तशी सृष्टी. सृष्टी कोणास सुखरूप दिसते तर कोणास दुःखरूप. खरे पाहिल्यास सृष्टीत कोणीही सुखी नाही वा दुःखी नाही. हा भेदभाव सृष्टीत नसून दर्शकाच्या दृष्टीतच सामावलेला असतो. आपल्या दृष्टीनुसारच सृष्टी दृक्गोचर होत असते. आपण चांगले तर जग चांगले.आपण वाईट तर जग वाईट बालकाप्रमाणे निर्दोष, निर्विकारी दृष्टी ठेवल्यावरच श्रीरामाचे स्वरूप ओळखता येईल. संयम व ब्रह्मचर्याद्वारेच जीवनातील दोष नष्ट होऊ शकतात. अहंकाराचा विसर पडला पाहिजे. अहंभाव व स्वाभिमान नष्ट होणे अत्यावश्यक आहे. तदनंतरच बालकाप्रमाणे जीवन जगण्याचा प्रयत्नही आपणाद्वारे होऊ शकतो. बालकाप्रमाणे निर्मोही व निर्विकारी झाल्यावरच आपले हे शरीर अयोध्या वा शिर्डीसारखे–पावन होणे शक्य आहे. जिथे युद्ध, वैर, इर्ष्या नाही तीच आपली शिर्डी–तीच अयोध्यानगरी आहे.

बालकांडानंतर **अयोध्याकांड** येतो. अयोध्याकांड मानवास निर्विकार बनवितो जीव जेव्हा भक्तीरुपी शरयुनदीच्या काठी रहातो तेव्हाच तो निर्विकारी बनू शकतो. भक्ति अर्थात प्रेम. रामायणातील अयोध्याकांड हा आपणास प्रेम प्रदान करतो. श्रीरामाचे भरतप्रेम, सावत्र मातेशी प्रेम इ. सर्व अयोध्याकांडातच वर्णिलेले आहे. श्रीरामाची निर्विकारिता येथेच दिसून येते. जो मानव प्रेमपूर्वक अयोध्याकांडाचे पठण करतो त्याचे घर अयोध्येशी समरूप बनते. त्याच्या घरी भांडणतंट्यास मुळीच वाव नसतो. गृहस्थाश्रमीयांना हे कांड परम सुखदायी आहे. अयोध्याकांडाद्वारे आपणास निर्वैरता प्राप्त होते. धन, प्रतिष्ठा, आत्माभिमान हेच सर्व या संसारिक कलहाचे मूळ आहे.

कुटुंबातील सर्व मंडळीशी आपण भगवत भाव ठेवावयास हवा. आपल्या बंधुभगिनीतच जो ईश्वर-दर्शन करू शकत नाही त्यास शिर्डीच्या मंदिरात तरी साक्षात ईश्वर "श्रीसाई" कसा काय दिसणार ?

कैकयी म्हणाली होती :– "अयोध्येचे राज्य माझ्या भरतास दिले जावे." वनवासात जाताना श्रीरामानी म्हटले, 'आई ! जर राज्यप्राप्तीनेच माझा भाऊ सुखावतो तर मला त्यातच आनंद आहे.'

जो आपल्या बंधूत ईश्वर पाहत नाही त्या दुर्दैवीस मंदिरातही ईश्वर दिसू शकत नाही. मूर्तिवासी ईश्वर आपल्या मागे धावू शकत नाही–ही जाणीव असतानाही त्या मूर्तित आपणास भगवत–भाव स्थिर करायचे आहे. परंतु जी व्यक्ति कुटुंबजनाशी अर्थात सजीव ईश्वराशी प्रेमभाव जोडू शकत नाही तो त्या दगडी मूर्तीशी कसा काय देवत्व भाव जोडू शकणार ?

सृष्टीसर्जनानंतर येथील प्रत्येक वस्तूत ईश्वराने प्रवेश केला. जोपर्यंत त्यांचा प्रवेश होत नाही तोपर्यंत सृष्टी निरर्थक आहे. ईश्वर सर्वात आहे. माझे आई-वडील, भाऊ, बहिण आदीत तोच ईश्वर वास करीत आहे आणि, हे सर्व ओळखूनच आपल्या भावाच्या सुखाकरिता श्रीरामचंद्रप्रभूंनी सहर्ष वनगमन केले.

भरताचे भ्रातृप्रेमही तसेच दिव्य आहे. त्यांनीसुद्धा राज्यकारभार स्वीकारण्यास विरोध केला. त्याग व निर्लोभिताची जणू काही शर्यतच लागलेली आहे– असे एकंदरीत वाचकास व श्रवणार्थियांना वाटते.

"माझे ज्येष्ठ बंधू रानावनात फिरत आहेत. कंदमूळे खात आहेत; व माझ्याच कारणास्तव दुःखी अवस्थेस प्राप्त झालेत तर मी कसा काय राज्याचा स्वीकार करू ? मीच जर जन्मलो नसतो तर माझ्या मातोश्रीने असला वर मागितला तरी असता काय ? नाही ! मुळीच नाही. श्रीरामास अरण्यवास कदापि घडला नसता."

व इकडे श्रीराम म्हणतात :– 'न सर्वे भ्रातरस्तात भवन्ति भरतोपमाः ।' अर्थात् 'माझ्या भरतासारखा बंधू लाभणे सर्वांच्या नशिबी नाही. खरोखरच मी फार भाग्य-वान आहे की असला धाकटा भाऊ मजला लाभला.'

ज्याच्या पठणाद्वारे प्रत्येकाविषयी आपुलकी निर्माण होऊन, घरातील भांडण-तंट्याचा ऱ्हास होतो व शांतता नांदते त्यास अयोध्याकांड म्हणतात. जीवनास विशुद्ध प्रेममय बनवा.

आयोध्याकांडानंतर **अरण्यकांड** लिहिले गेले आहे.अरण्यकांड आपणास वासना-रहित अर्थात निर्वासन बनवितो. निर्वैर झाल्यानंतरही वासनेचा क्षय होत नाही; वासनेचे आपल्यावरील आक्रमण थांबत नाही. अरण्यकांडाचे वाचन, श्रवण, चिंतन मनन व अवलंबन केल्यास या वासनेचा क्षय संभवतो; अरण्यवास व तपाशिवाय जीवनात दिव्यता

येऊ शकत नाही. श्रीरामानी सीतामाईबरोबर वनवास व तपश्चर्या केली व नंतरच राजा झाले. उद्या श्रीरामाचे राज्याभिषेक होणार ही गोष्ट निश्चित होती. स्वतः राजा दशरथासही याविषयी शंका नव्हती. परंतु कैकेयीच्या हट्टास बळी पडून त्यांना तिला दिलेले वर पूर्ण करावे लागले. मनात माझी आज्ञा पाळलीच पाहिजे अशी इच्छा नसतानाही फक्त व्यक्तिगत प्रतिष्ठा व राज्यनिष्ठा या दोहोंच्या पालन हेतूनेच श्रीरामास वनगमनाची आज्ञा त्यांनी दिली. राजा दशरथांनी सीता व लक्ष्मणास वनगमनाविषयी फर्माविले नव्हते. तरी पण श्रीराम अरण्यवास करणार हे ऐकताच हे दोघेहि त्यांच्या सोबत जावयास तत्पर झाले. लक्ष्मणांनी आपली पत्नी-ऊर्मिलेशी 'मी जातो' इतकेच म्हटले. 'मी जावे की न जावे' असे विचारले नाही. धन्य ती ऊर्मिला व धन्य लक्ष्मण इथेच सीतामातेचे पतिप्रेम, लक्ष्मणाचे बंधुप्रेम व ऊर्मिलेची पतिआज्ञापालनभक्ती दिसून येते. वास्तविकपणे पाहिल्यास श्रीराम हे कौसल्येचे पुत्र होते व लक्ष्मण सुमित्रेच्या उदरी जन्मले तरीपण श्रीराम काय म्हणतात—

'यत्र भ्राता सहोदरः'

अर्थात आम्ही एकाच मातेच्या पोटी जन्मलेले बंधु आहोत. यावरून कळून येते की सत्यनिष्ठ श्रीराम हे लक्ष्मण व इतर बंधुकडे किती विशाल दृष्टीकोनातून पाहत होते. असो.

ज्या व्यक्तीने पूर्वी तपश्चर्या केली असेल, केवळ तोच भोगोपभोग व ऐश्वर्यमय प्रसंगाना सावधानीपूर्वक तोंड देऊ शकतो. जवळ जवळ सर्वच महान आत्म्यांनी अरण्यवास केल्याविषयी इतिहास साक्षी आहे. जीवनात तपश्चर्या आवश्यक आहे. आपण मानवासाठी बाह्य आडम्बर नको परंतु आंतरिक तपश्चर्या ही अत्यावश्यक आहे. वन-वासाशिवाय जीवनात सुवास नाही.

'वनवासाशिवाय जीवन सत्वहीन आहे. मानवह्रदय आंतरीक वनवासाद्वारे कोमल बनते व ईश्वराच्या अस्तित्वाबद्दल त्यास ओळख पटते. ईश्वराशिवाय या जगात आपला कोणी वाली नाही या गोष्टीची जाणीव होऊ लागते. श्रीरामचंद्रप्रभूंनी स्वतः ईश्वर असूनही—

'तपाशिवाय वासनेचा क्षय अशक्य आहे'—हाच धडा वनवासाद्वारे आपल्या-समोर मांडला, तपासारखे सर्वोत्कृष्ट संयम दुसरे कोणतेही नाही. सर्वप्रथम या जिव्हेवरच संयम असावयास पाहिजे. वनवासात श्रीरामांनी अन्नाहार नव्हे केवळ फलाहारच केला होता. अन्नात असणारे रजोगुण कामास उत्तेजित करतात. कामवासना अधिकाधिक वळावते. सात्विक आहाराभावी कामाचे विनाश अशक्य आहे. कंदमूळ वगैरे ग्रहण करूनच वनवासात श्रीरामानी तप केलेले होते. अरण्यात असताना धनुष्यबाणाशिवाय इतर कोणत्याही धातुस (तमोगुण) स्पर्श केला नाही. वृक्षाच्या पानाच्या द्रोणाद्वारेच ते पाणी प्राशन करायचे. तिथे सीतामातेसोबत राहूनही श्रीराम पूर्णतः निर्विकारी होते. हळूहळू

वासनेचा क्षय कसा करावा. हे आपणास श्रीरामायणातील अरण्यकांडात पाहवयास मिळते. सात्विक जीवनाच्या अवलंबनाद्वारेच वासनेवर विजय मिळविणे शक्य आहे. तपश्चर्येद्वारेच रावणाचा नाश संभवितो. कामरूपी रावण अरण्यवासरूपी तपश्चर्येद्वारेच ठार होऊ शकतो. याशिवाय अरण्यकांडात आपणास शूर्पणखा अर्थात वासना व मोहाकडे श्रीराम कधीही आकृष्ट होत नाही. ते तर फक्त शबरीकडे व शुद्ध भक्तीकडेच आकृष्ट होतात. श्रीरामाची वा साईबाबांची सोन्याची वजनदार मूर्ती बनवा. तसेच संपूर्ण सोन्याचे देवालय बनवा. परंतु जोपर्यंत मनात भक्तिभाव उपजत नाही तोपर्यंत सेवकास व देवास हे सर्व काय कामाचे ? आपण श्रीसाईसमर्थाची मूर्ती वा तसबिरी (छबी) चे मानसिक पूजन करा. किंवा प्रत्यक्ष पूजन करा–तोपर्यंत हे सर्व व्यर्थच म्हणायचे, परंतु हे सर्व एकीकडे ठेवून कित्येक ठिकाणी अलिकडे हा वाद उठतो श्रीबाबांची मूर्ती पूजणे योग्य आहे वा छबी पूजणे योग्य आहे. अहो ! आपले असे बोलणे किती अयोग्य आहे व असले शब्द काढण्याच्या आपण योग्यतेचे तरी आहोत काय ? याचा कोणीही विचारच करीत नाही. मोहाचा व असल्या फाजील वादावादीचा त्याग करून आपणसुद्धा शुद्ध भक्ती अंगिकारली पाहिजे.

निर्वैर, निर्विकार व वासनारहित झालेला मानवच ईश्वराशी मैत्री जोडण्याच्या योग्यतेचा होतो. अरण्यकांडानंतर रामायणात **किष्किंधाकांड** आहे. इथेच श्रीरामाची सुग्रीवाबरोबर मैत्री जुळली. सुग्रीवाने कामाचा त्याग केला म्हणूनच श्रीरामाशी 'ईश्वर मिलाप' घडला. ब्रम्हचर्य व संयम यांच्या संयुक्त स्वरूपास आपण हनुमंत म्हणून संबोधितो. जेव्हा ब्रम्हचर्य व संयम पाळले तेव्हाच हनुमान प्रसन्न होऊ शकतात. नंतरच बजरंगबली आपल्या पक्षातर्फे ईश्वरभक्ति मध्यस्थी करण्यास प्रवृत्त होतील. त्यानंतरच 'ईश्वर मीलन' शक्य आहे. ज्याचा कंठ सुंदर तोच सुग्रीव आहे. प्रेमळपणाचे मोजके शब्द बोलण्यातच कंठाची मधुरता आहे. कंठाचे असले माधुर्य वाढविण्यास आभूषण नको तर ब्रम्हचर्य व रामनामाच्या साधनेचाच अवलंब करावा. ईश्वर आणि जीवाची मैत्री श्रीहनुमान–ब्रम्हचर्य या साधनेवरच अवलंबून आहे. सुंदर कंठ असणाराच ब्रम्हचर्य व संयमाद्वारे ईश्वर प्राप्ती करून घेऊ शकतो. केवळ सुग्रीव एकटा काही एक करू शकत नाही. बजरंगबलीकडून सहयोग प्राप्त झाल्यावर तो ईश्वराशी मैत्री करण्याच्या मार्गावर प्रवृत्त होतो. श्रीहनुमंताच्या मध्यस्थीमुळेच श्रीरामचंद्रप्रभूंनी सुग्रीवास आलिंगन दिले.

यानंतर येतो **सुंदरकांड**

ईश्वराशी मैत्री झाल्यावरच जीवन सुखमय व सुंदर बनत असते. श्रीरामायणातील सुंदरकांड खरोखरच नावाप्रमाणे सुंदर आहे. यात श्रीरामभक्त हनुमंताची कथा वर्णित केली गेली आहे. भागवताच्या दशम स्कंदाप्रमाणेच रामायणातील हे सुंदरकांड मनोहर व रूचीपूर्ण आहे. हनुमंतास श्रीसीतामातेचे दर्शन या सुंदरकांडात घडले. सीतामाता पराभक्ति स्वरूप आहे.परंतु त्यांचे दर्शन केव्हा शक्य आहे ? तर– जीवन निर्वैर, निर्विकार

व वासनारहित होऊन ज्यास ईशचरणी प्रिती उत्पन्न झालेली आहे व :याद्वारे ज्याचे जीवन सुखमय, सुमधुर व सुंदर झालेले आहे, केवळ तोंच मानव या पराभक्तिरुपी दर्शन करू शकतो. दृढ निष्ठा व सबुरीद्वारे भवसागर पार करणाराच या पराभक्तीचे सीतेचे दर्शन करू शकतो. केवळ हनुमंतच या संसारसागरास सहज:व सुलभतेने पार करू शकतात वा आपणास पार नेऊ शकतात. ब्रह्मचर्य व रामनामाच्या जपामुळे त्यांच्यात दिव्य अशी शक्ति निर्माण झाली व क्षणार्धात एका उडीद्वारेच त्यांनी सागर पार केले. मार्गात त्यांना सुरसा मिळाली. तिने त्यांना कष्ट देऊन विघ्न आणण्याचे प्रयत्न केले. उत्तमोत्तम पदार्थांचे व रसाचे शोषण करणारी जिव्हाच " सुरसा " आहे. साक्षात् संयमापुढे ती काय टिकणार ? हनुमन्त या सुरसेस संयमाद्वारे नष्ट करतात. भवसागरास पार करणाऱ्या इच्छुकांनी प्रथम:या जिव्हेसच आपल्या शांत केले पाहिजे. या स्वाद किंवा चवरुपी वासनेचा क्षय होणे – भक्तिमार्गावर अग्रसर होणाऱ्यांना अत्यावश्यक आहे. हिचा पूर्णतः विनाश झाला पाहिजे. आपल्या श्रीसाईमाऊलीस याविषयी अजिंक्य-पद प्राप्त झाले होते. माधुकरी व भिक्षेद्वारे केवळ पाच घरून त्यांना जे काही मिळायचे ते सर्व एकत्रित करून, काही विशिष्ट अन्नदानासाठी काढलेला भाग वगळून, ते ग्रहण करायचे. त्यात गोड, आंबट, तिखट, खारट हे सर्व असायचे. परंतु श्रीबाबांच्या चवरुपी वासनेचा पूर्णतः क्षय झाला होता. म्हणूनच ते असला गोपाळकाला ग्रहण करायचे. असो.

जीवनास सुंदर बनवायचे असल्यास त्यास भक्तिमय करा.सीताजी पराभक्ती आहेत. जिथे पराभक्ती आहे तिथे शोकास मुळीच स्थान नाही. जिथे सीतारुपी पराभक्तीचा वास आहे तिथेच अशोकवन आहे. अशोकवनात शोकास मुळीच स्थान नाही. ब्रम्हदृष्टी या सिद्धीनंतरच शोक राहात नाही. अर्थातच आपण परमानंदच्या अवस्थेत अशोकवनातच हिंडत असतो.

### त्यानंतर येतो **लंकाकांड**

जीवन भक्तिमय व सुंदर झाल्यावर रामायणातील लंकाकांडामध्ये दैत्यांचा संहार झाला. दैत्य मरतात तर कामसुद्धा मरतो. क्रोधहि नष्ट होतो. भक्तीदेवीच्या दर्शनाद्वारे जीवन सौंदर्याने परिपूर्ण झाले. लंकाकांडामध्ये रावणरुपी कामही ठार झाला.

भक्तीने परिपूर्ण झाल्यावरच जीवन सुंदर व परम सुखमय सुखमय बनते. जो कामास ठार करू शकतो त्याच्यापुढे काळही घाबरतो. कामाद्वारे जखडल्या गेलेल्या मानवास काळ अधिकाधिक जखडतो. 'लंका'च्या अक्षरास उलटे मांडल्यास 'काल' अर्थात 'काळ' हाच ध्वनि गुंजायमान होतो. काळ सगळ्यास झोडपतो, परंतु 'हनुमंत' तर त्या काळावरच झडप घालतात. ते लंकेस अर्थात काळास जाळतात. हनुमंतास काळ मारू शकत नाही कारण ते ब्रह्मचर्येचे पालन करून पराभक्तिचे दर्शन करतात.

त्यानंतर **उत्तरकांड** लिहिले गेले आहे. या कांडाच्या पठणाद्वारे मुक्ती प्राप्त होते असा समज आहे. गरुड आणि काकभुशुंडीच्या संवादास वारंवार ऐका. जोपर्यंत दैत्य

रुपी कामवासनेचा नाश होत नाही तोपर्यंत उत्तरकांडात प्रवेश वर्ज्य आहे. उत्तरकांडात भक्तिची कथा वर्णिली गेली आहे. ईश्वराशी एका क्षणासाठीही जो विभक्त राहू शकत नाही तोच खरा भक्त आहे.

पूर्वार्धात जो रावणास ठार करतो त्याचेच उत्तरकांड सुंदर बनत असते. तोच वृद्धावस्थेत आत्मानंद अनुभवतो.

जीवनाच्या पूर्वार्धात अर्थात तारुण्यावस्थेत कामवासनेस मारण्याचा प्रयत्न करा तेव्हाच उत्तरकांड अर्थात आपली वृद्धावस्था सुधारेल.

करिता भक्तिमार्गास लागण्याचा प्रयत्न आपण ऐन तारुण्यातच केला पाहिजे म्हणजे आपली वृद्धावस्था सुंदर व सुदृढ होईल.

याप्रकारे रामायणातील हे सातकांड मानव उन्नतीचे सोपान आहेत.

*

**[ असामान्य कर्तृत्व, अनुपम दातृत्व आणि अत्युत्तम कवित्व यांचा त्रिवेणी संगम असणारे कवि— ]**

# र ही म

**● श्री. विनायक पाठक**
बी १७/२३४ राजावाडी, घाटकोपर

**लागली सगुण रुपाची ओढ :**

सोळाव्या शतकापर्यंत वैष्णव संप्रदायाने भारतात चांगलेच मूळ धरले होते. इकडे भारतीय मुसलमानामध्येही सूफी संप्रदायाचा बोलबाला होत होता. नानक, कबीर आदि संतांनी ईश्वर–अल्ला एकच आहेत ही शिकवण भारतीय जनमानसात चांगलीच रुजविली होती, आणि विशेष म्हणजे वैष्णव संप्रदाय, सूफी संप्रदाय व कबीर नानकांनी शिकविलेला एकेश्वरवाद या सर्वांचा दृष्य परिणाम म्हणजे जनमानसाचा कल निर्गुण-निराकार परमेश्वराकडून सगुणसाकार परमेश्वर रूपाकडे झुकू लागला. लोकांमध्ये देव-देवतांच्या अवतारासंबंधी अधिकाधिक उत्सुकता व श्रद्धा निर्माण होऊ लागली. व या अवतार वादाची ओढ व परिणाम रहीम कवीवर होणे अपरिहार्यच झाले. हिंदूच्या अवतारवादाचा प्रभाव रहीम कविच्या काव्यातील हिंदु वेद–पुराणातील मार्मिक दाखले–दृष्टांत वाचून रहीम कविवरही झाल्याचे स्पष्ट दिसते.

**मर्त्य रहीम—अमर दोहे :**

सुमारे साडेतीनशे वर्षाहून अधिककाळ लोटला असला तरी लोक रहीमचे दोहे अजून विसरले नाहीत. लौकिकार्थाने रहीम आज हयात नसले तरी ते आपल्या नीती-विषयक दोह्यांच्या रुपात आजतागायत कीर्तिरूपे जिवंत आहेत व पुढेही राहतील. तुलसी-दासांचे दोहे–चौपाया, गिरीधर कवींच्या कुंडल्या ज्याप्रमाणे आजही अनेक लोकांना मुखोद्गत आहेत त्याचप्रमाणे कवि रहीमचे दोहेही भारतात– विशेषतः उत्तर भारतातील ग्रामीण जनतेत विशेष लोकप्रिय आहेत.

## रहीम रहिमन पाही दुर्दिन :

रहीम कवि म्हणजे अकबर बादशहाचा प्रसिद्ध मोंगल सरदार बैराम खाँ खान-खाना यांचा मुलगा. रहीम कविंचा जन्म संवत् १६१३ मध्ये लाहोर येथे झाला. यांचे पूर्ण नाव नबाब खानखाना मिरजा अब्दुल रहीम असे होते. परंतु आपल्या कवितेमध्ये त्यांनी सुटसुटीत ' रहीम 'हेच नाव धारण केले. त्यांच्या बहुतेक दोह्यात त्यांनी आपले ' रहीम ' ' रहीमन ' हे नाव मोठ्या कौशल्याने गोवलेले आढळते.

रहीम कविंचे वडील बैरामखाँ हे फार बुद्धिमान व शूर होते. काही काळ ते राजा अकबराचे शिक्षकही होते. त्यांच्या उत्तरायुष्यात बैरामखाँ आणि अकबराचे काही मतभेद झाल्यामुळे त्याना पकडून आणून अकबरासमोर उभे करण्यात आले. आपले कर्तृत्ववान जीवन राजरोषास कारणीभूत होऊन अनर्थ होऊ नये म्हणून सम्राट अक-बराची त्याने क्षमायाचना केली व मक्केस जाण्याची अनुमति मागितली. बैरामखाँची सेवा लक्षात घेता दयाळू अकबरानेही त्याला मक्केस जाण्याची परवानगी दिली. पण दुर्दैव जणू बैरामखाँच्या पाठीस लागले होते ! मक्केच्या वाटेवर कुणा एका पठाणाने बैरामखाँला अल्लाघरी पाठविले. त्यावेळी बालक रहीम फक्त चार वर्षांचे होते. एके काळच्या एकनिष्ठ बैरामखाँच्या मृत्यूचे वर्तमान कळताच अकबर बाद-शहालाही वाईट वाटले व कोवळ्या वयात अनाथ झालेल्या बालक रहीमच्या पालन-पोषणाची व शिक्षणाची व्यवस्था अकबराने केली.

## अवगत केल्या अनेक भाषा : अनेक पदव्या :

बालक रहीम जात्याच तल्लख बुद्धीचे होते. त्यामुळे वाढत्या वयाबरोबर त्यांची समजही वाढत गेली व त्यांनी हळुहळू संस्कृत, अरबी, फारसी आदि भाषा अवगत करून त्यावर चांगलेच प्रभुत्व मिळविले. त्यामुळे अकबराच्या मुलाचे शिक्षक व संरक्षक अशी दुहेरी जबाबदारी रहीमांना सांभाळावी लागली. रहीम बुद्धिमान तसेच शूरही होते- मोंगलांचा साम्राज्यविस्तार वाढविण्यात रहीमांचा सिंहाचा वाटा होता. युद्धशास्त्रा-तील विविध डावपेचांचे अचूक ज्ञानामुळे त्यांना नेहमी निरनिराळ्या युद्ध मोहिमांवर रहावे लागे. त्यांची संघटनकुशलता व युद्धनिपुणता पाहून अकबर बादशहाने त्यांना वेळोवेळी 'मिरजाखाँ' 'मीर–अर्ज' 'खान–खाना' अशा अनेक मानाच्या पदव्या (किताब) बहाल केल्या–तशीच गुजरात, अजमीर वगैरे प्रदेशाची सुभेदारीही त्यांना

मिळाली होती. रहीमची विद्वत्ता, गुणवत्ता, तल्लखपणा, कार्यकुशलता व प्रगाढ अनुभव हेरून राजा टोडरमलच्या मृत्युनंतर अकबराने रहीमला महामंत्रीपदावरही नियुक्त केले होते.

### नाहीत फक्त शूर, दानात दानशूर :

कवि रहीम नुसतेच शूर नव्हते तर ते दानशूरही होते. तत्कालीन कर्ण म्हणूनच त्यांची ख्याति होती. कोणत्याही याचक वा अतिथीला त्यांनी रिक्तहस्ताने पाठविले नाही. निःस्वार्थ दान हीच त्यांची वृत्ती होती. स्वार्थाचा लवलेशही त्यांच्या दानात नव्हता. असे म्हणतात की त्यावेळी अत्यंत प्रतिभासंपन्न म्हणून लौकिक असणाऱ्या गंग कविला रहीमांनी ३६ लाख रुपये दिलेत अशा तऱ्हेचा एका व्युत्पन्न कविने दुसऱ्या प्रतिभावंत कविचा केलेला हृद्य सत्कार हा साहित्य-प्रांतात अलाहिदाच ! दानात दिलेल्या रकमेच्या तपशीलात मतभेद किंवा फरक आढळत असला तरी वस्तुस्थिती शिल्लक उरते ती रहीम कविच्या गुणग्राहकतेची व रसिक वृत्तीची.

### व्यक्तित्वाचे अनंत पैलू :

भाषा–प्रभु, प्रधान, सेना–नायक, मंत्री, दानशूर, कवि, गुणग्राहक असे रहीमच्या व्यक्तित्वाचे अनंत पैलू असल्याने रहीमचे व्यक्तिमत्व बहुरंगी व बहुढंगी असे बनले होते, आणि त्यामुळेच रहीमच्या काव्यात' रचनात्मक वैचित्र्य आणि अनुभवाची प्रगाढता आढळून येते.

### दानी झाला दीन अचानक :

जहांगिराच्या वेळी एका लढाईत फितुरी केल्याचे किटाळ रहीमवर आले आणि त्यांची सगळी जहागीर जप्त करण्यात आली. त्यांना कैदही करण्यात आली. रहीम अक्षरशः कंगाल झाले. लाखो रुपये दान देणारा दीन झाला. तरीही दरिद्री झाल्याचे दुःख यांना कधीच झाले नाही. आपणास दानधर्म करणे अशक्य होत असल्याची जाणीव मात्र त्यांना नेहमी अस्वस्थ करी. आपल्या दारी आलेल्या याचक अतिथीला विन्मुख पाठविताना रहीमला दारुण वेदना होत ! जोपर्यंत जगाला देण्यासारखे आपल्या जवळ आहे तोपर्यंतच माणसाने जगावे असे त्यांचे प्रांजल मत होते. हे मत त्यांनी आपल्या खालील दोह्यात स्पष्ट केले आहे.

" तबही लौ जी बौ भलो, दीबौ होय न धीम जगमे रहिबो कुँचित गति, उचित होय न रहीम "

आपल्या विपन्नावस्थेत रहीम दारोदार हिंडू लागले. पण त्यांचे सर्व यार-दोस्त त्यांना पाहताच आपली दारे धडाधड बंद करू लागली. केवढा दुर्दैव-विलास हा ? " कठिण समय येता । कोण कामास येतो " ची वेदना त्यांच्या खालील दोह्यात स्पष्ट होते.

" ये ' रहीम ' दरदर फिरै माँगि मधुकरी वाही
यों यारी छाँडिए, अब रहीम वे नाही ॥ "

दुर्दिन येताच पूर्वीचा रहीम मेला हेच कठोर सत्य या दोह्यातून डोकावते. त्यांनी आपल्या कंगाल परिस्थितीत त्यावेळच्या रेवा नरेशाकडे एक अर्थपूर्ण दोहा लिहून पाठविला आणि काय आश्चर्य ? अर्थगर्भ दोहा वाचून रेवा नरेशाने एक लाख रुपये इनाम म्हणून दिले असे म्हणतात. तो दोहा असाः—

" चित्रकूटमें रमि रहैं, रहिमन अवध नरेस जापर विपदा परति है, सो आवत इस देस।" ( भावार्थः आपल्या विपन्नावस्थेत अवध नरेश म्हणजे साक्षात् प्रभु रामचंद्र-सुद्धा चित्रकूट पर्वताच्या परिसरातच भ्रमंति करीत होते. ज्या कुणावर संकटाची कुऱ्हाड कोसळते त्याला याच परिसराचा आश्रय घ्यावा लागतो. आणि म्हणूनच मीहि भ्रमंति करीत इकडेच आलो.

## दुर्दैवाचा दशावतार :

रहीमवर परिस्थितिवश अठराविश्वे दारिद्र्य आले असले तरी ते अत्यंत स्वाभिमानी होते. हे त्यांच्या खालील दोह्यावरून स्पष्ट होते:—

" रहिमन मीहि न सुहाय, अमि पिआ वै मानबिनु बरु विष देय बुलाय, माना सहित मरिबो भलो ॥ " अपमान सहन करून अमृत पिण्यापेक्षा सन्मानाने बोलावून दिलेले विष प्राशन करून मरून जाणे अधिक उचित असे रहीम कविचे म्हणणे ! दुर्दैवाच्या दशावतारातसुद्धा रहीम नेहमी मानानेच राहिले.

## रहीम–तुलसी रसिक शिरोमणी :

" रहीमांचा व संत तुलसीदासांचा घनिष्ठ संबंध होता. कुणी एक गरीब ब्राम्हण मुलीच्या लग्नात पैशासाठी म्हणून अडला होता तेव्हा तो ब्राम्हण तुलसीदासांकडे गेला. तुलसीदासांनी त्याला एका दोह्याची एक ओळ लिहून कवि रहीमांकडे पाठविला. " सुरतिय, नरतिय, नागतिय यह चाहत सब कोय। " अशी दोह्याची ओळ वाचून रहीमने त्या ब्राम्हणाला बरेच द्रव्य दिले व तुलसीदासांचा दोहा दुसरी ओळ स्वतः लिहून पूर्ण केला.

" गोद लिए हुलसी फिरै तुलसी सी सुत होय ॥ "

## संत होते—पंत होते :

कवि रहीम संत होते किंवा नाही हा वादाचा किंवा मतभेदाचा विषय असला तरी ते सत्प्रवृत्त होते याबद्दल कुणाचे दुमत होणार नाही. त्यांनी लिहिलेले नीतिविषयक दोहे व त्यांच्या दोह्यातील वेद–पुराणातील मार्मिक दृष्टांत-संदर्भ हे त्यांच्या संतवृत्तीचे—सत्प्रवृत्तीचेच दाखले आहेत असे म्हटले तर ते अतिशयोक्तीचे होऊ नये.

**मधुघट भरले साहित्याचे :**

रहीम कविंनी दातृत्व, मैत्री, सत्संग, परोपकार, दीनता, भाग्योदय, स्वाभिमान वगैरे अनेक विषयावर — अनेकविध व्यावहारिक विषयावर मार्मिक, रोचक व अर्थगर्भ दोहे लिहिले आहेत. रहीमच्या काव्याचे स्थूलमानाने वर्गीकरण करायचे म्हटले तर ते खाली चार विभागात करता येईल.

१) ईश्वराधना व भक्तिभावनांचा आविष्कार असणारे दोहे,

२) नायक–नायिका भेद व शृंगार भावनानी युक्त असलेली रचना,

३) नीतिविषयक व व्यवहारविषयक मार्मिक विवेचन करणारे दोहे

व

४) फुटकळ विषयावर लिहिलेले अनुभूतिपूर्ण व अर्थपूर्ण दोहे.

तथापि तुलनात्मक दृष्टीने पाहिले तर त्यांनी नीतिविषयक दोहेच विपुल प्रमाणात लिहिले आहेत म्हणूनच संत साहित्यिकात आम्ही त्यांचा परामर्ष घेतला आहे – रहीमच्या दोह्यांव्यतिरिक्त कवित्त, बरनै, सवैया, सोरठे रासपंचाध्यायी, मदनाष्टक वगैरे फुटकळ रचनाही बरीच प्रसिद्ध आहे.

रहीम कविंचा व्रज भाषेवर (मथुरा, वृन्दावन–गोकुळ परिसरात प्रामुख्याने बोलली जाणारी भाषा) व अवधी भाषेवर (अवध प्रांतात बोलली जाणारी भाषा) सारखेच प्रभुत्व होते. त्यामुळे त्यांनी दोन्ही भाषेत विपुल साहित्यसृजन केले.

रहीम दोहावली, शृंगार सोरठ, रहीम रत्नावली हे त्यांचे काव्यग्रन्थ विशेष प्रसिद्ध होत. त्यांनी लिहिलेला "दीवान" हा फारसी गझलांचा संग्रह व "वाकयात् बावरी" हा तुर्की ग्रंथाचा फारसी अनुवाद प्रसिद्ध आहे. रहीमांचा "खेट कौतुकम्" हा ग्रंथ ज्योतिषविषयक असून संस्कृत–फारसी या दोन्ही भाषांची खिचडी यात आढळते. "रहीम—काव्य" हा हिन्दी–संस्कृत अशा दोन्ही मिश्र भाषेत लिहिलेला ग्रंथ आहे.

**देव आणिक देवतांचे यवन देई दाखले :**

रहीम कवि जातीने मुसलमान असूनही त्यांच्या काव्यात हिन्दु देव-देवतांची व पुराणातील मार्मिक दृष्टांतांची रेलचेल आढळते. ही अभिव्यक्ति म्हणजे त्यांच्या विद्वत्तेची, गुणग्राहकतेची व रसिकतेचीच साक्ष नव्हे कां ?

" 'रहिमन' कोऊ का करै, ज्वारी, चोर लबार जो पत राखनहार है, माखन चाखनहार ।। या दोह्यात पांडवांचे जुवा खेळणाऱ्या कौरवांपासून व लबाड दुःशासनापासून श्रीकृष्णाने ( माखन चाखनहार ) संरक्षण केल्याचा दाखला आहे. ब्रह्मदेवाने गवळयांची मुले व गायी चोरल्या होत्या तेव्हा श्रीकृष्णाने अगदी तशीच प्रतिसृष्टि निर्माण केल्याचे सूचित केले आहे.

"रहीमन हम तुम सों करी, करी करी जों तीर
बाढ दिनके मीत सब गाढे दिन रघुबीर ।। "

या दोह्यात श्रीकृष्णाने गजेंद्राला (करी म्हणजे हत्ती) मुक्ति दिल्याचा दाखला असून आ कालात वाचविणारा फक्त रघुवीरच असल्याची रहीमांची श्रद्धा आहे.

लक्ष्मी (म्हणजे पैसा) चंचल आहे. हा स्वानुभव सांगताना रहीम म्हणतात. "कमला थिर न 'रहीम' कह, यह जानत सब–पुरुष नवल–पुरातन की बधू क्यों न चंचला होई?" लक्ष्मी ही विष्णुची (म्हणजेच पुरुष पुरातन) पत्नी आहे. अति म्हाताऱ्याची पत्नी चंचल असल्यास नवल ते काय? हे सत्य रहीमानी पुरुष पुरातन या शब्दावर श्लेष साधून मार्मिकपणे सांगितले आहे.

विधिलिखित अटळ आहे हे त्रिकालाबाधित सत्य सांगताना कवि रहिम लिहितातः '‘जो’ ‘रहीम’ भावी कतौं, होति आपुने हाथ। राम न जाते हरिन सँग, सीय न रावन साथ।!" आपले भविष्य–भाग्य आपल्याला ज्ञात असते तर प्रभु रामचंद्र सुवर्ण मृगाच्या पाठीस कधीच न लागते व सीतेलाही रावणाच्या तावडीत सापडायचे प्रयोजन नुरते.

ईश्वरी लीला व भाग्य चक्राचा फेरा अगाध आहे हे सांगताना महाप्रतापी अर्जुनावरसुद्धा 'सी अर्जुन बैराटघर, रहे नारि के भेष' ची पाळी आली हा दाखला देऊन गेलेत. हिंदु धर्मग्रंथातील निरनिराळ्या घटनांचा अचूक व सार्थक उल्लेखही रहीम कविच्या काव्याची आगळी विशेषता आहे. त्यावरून रहीम कविच्या संस्कृत ज्ञानाची, रामायण, महाभारत पुराण आदिच्या प्रगाढ अध्ययनाची झळक त्यांच्या काव्यात दिसते.

वानगीदाखल म्हणून खालील ओळी बघाः–

१) माँस दियो सिबि भूपने, दीयो हाड दधीच
२) पेट लागि बैराटघर तपत रसोंई भीम
३) मान सहित विष खाई के संभू भये जगदीश।
बिना मान अमृत पियो राहु कटायो सीश ॥
४) दुरदिन परे 'रहीम' कह बडे न किये घटिकाज।
पाँच रूप पांडव भये रथ वाहक नलराज ॥
५) भावी या अनुमान कै, पांडव बनहु 'रहीम'
जदपि गौरी सुनि बाँझ है, डरु है संभु अजीम

(पांडवासारखे बलवान पुरुष वनवासी झालेत व महाप्रतापी महादेवाची (शंभची) स्त्री असूनही पार्वती वांझच राहिली–गणपती व कार्तिक स्वामी पार्वतीच्या उदरी जन्मास आले नाहीत असे मानतात.)

**काव्याच्या चतु : सीमा :—**

रहीमांच्या काव्यात सुंदर सुंदर लोकोक्तिचीही रेलचेल आढळते. अभ्यासू वृत्ति सूक्ष्म निरिक्षण, प्रगाढ अनुभव व मार्मिक अभिव्यक्ती हां रहीमांच्या काव्याच्या चतु : सीमा आहेत. वानगीदाखल काही लोकोक्ति वाक्प्रचार पहा :–

१) पासे अपने हाँथ में, दाँव न अपने हाँथ
२) जो जानत सो कहत नहि, कहत सो जानत नही
३) निकट निरादर होत है (अति परिचयाद् अवज्ञा)
४) चाढे दिन के मीत सब, गाढे दिन रघुवीर
५) जहाँ गाँठी तहँ रस नहीं

**तत्वज्ञान : अहं आणि सोहं विरोध :—**

ईश्वरप्राप्ती ज्याला करायची आहे त्याने अहंचा ( म्हणजेच अहंकाराचा ) त्याग केला पाहिजे. कारण जेथे अहं आहे, तेथे सोहं ( म्हणजे ईश्वर ) असणे असंभवनीय आहे—अहं आणि सोहं एकत्र कधीच नांदत नाहीत हे सांगताना रहीम म्हणतात :

'आप अहे तो हरि नही, हरि तो आपन ।
नही 'रहिमन' गळि है साकरी, दोनों नहि ठहराहि ॥'

तात्पर्य अहंचा नाश झाल्याशिवाय सोहंची प्राप्ती होणे अशक्य आहे ।

**नको गुंतू मायाजालीं :**

मुलगा, बायको मोह-माया या फंदात न पडता आपत्कालीचा जो खरा मित्र आहे त्याची आर्धीपासूनच तू कास का धरीत नाहीस ? असा प्रश्न विचारताना रहीम म्हणतात:

" धन, दारा औ सुतन में, रहत लगाये चित्त
क्यों ' रहीम ' खोजत नही, गाढे दिन का मित्र ? "

**जगीं ज्यास कोणी नाही, देव त्याचा आहे :**

ईश्वर अनाथांचा नाथ आहे ही रहीमांची दृढ श्रद्धा आहे. ते म्हणतात, " ' रहीमन ' बहु भेषज करत, व्याधि न छाँडति साथ । खग, मृग बसत अरोग बन हरि अनाथ के नाथ ॥ " औषधपाणी करूनही रोगव्याधी आमचा पिच्छा पुरवतातच ! पण पशु-पक्षी जंगलात उघड्यावर राहूनही रोग त्यांच्या वाटेसही जात नाही कारण ईश्वर अनाथांचा नाथ आहे, म्हणून हे मानवा, तू सतत त्याची कांस धर हा आशय.

**जगाच्या कल्याणा संताच्या विभूति :**

माणसाने नेहमी उपकारी असले पाहिजे हे सांगताना रहीम कवि दृष्टांत देतात :- " तरुवर फल नहि खात है, सरवर पियत न पानि कहि 'रहीम' परकाज हित, संपति सुचहि सुजानि ॥ " या दोह्यात रहिमानी लोककल्याणाच्या भावनेला अग्रस्थान दिले आहे. " जगाच्या कल्याणा, संताच्या विभूति " या सुभाषितातील भावनेचाच हिन्दी आविष्कार या दोह्यात रहिमांनी केला आहे.

**असीम संयम हवा, हवा तो :**

माणसाने जीतेंद्रिय असले पाहिजे असे रहीम म्हणतात, एकदा शरीर ताब्यात असले म्हणजे मनही आपोआप तशीच साथ देते हे सांगताना रहीमांनी छान दृष्टांत

दिला. ते म्हणतात :– “ जो ‘ रहीम ’ तनु हाथ है, मनसा कहुँ किन जाहि
जल में जो काया परें, छाया भीजति नाहिं ॥ ”

भावार्थ : पाण्यात शरीराची छाया पडत असली तरी शरीर पाण्याच्या बाहेरच राहते. माणसाने आपल्या इच्छांचे गुलाम बनता कामा नये. आपले शरीर आपल्या ताब्यात हवे. या संदर्भात “ पडीले वळण इंद्रिया सकळा । भाव तो निराळा । नाही दूजा ॥ ” या अभंगाची आठवण झाल्या शिवाय राहत नाही.

### जीवन नौका खेचत ईश्वराकडे:

संसाररुपी जलप्रवाहात शरीररूपि नौका आपल्या कर्मानुसार वाहत चालली आहे. तिला ईश्वराकडे खेचत आण हे सांगताना एके ठिकाणी रहीम लिहितात-

“ तनु ‘ रहीम ’ है कर्मबस, मनु राखौउहि ओर
जलमें उलटी नाव ज्यौ, खेचतगुनके जोर ॥ ”

### सर्वे सर्वा तो भगवंत मी तर आहे निमित्त मात्र :

कर्ता करविता ईश्वर आहे. माणूस फक्त निमित्त मात्र असतो. एकदा कवि गंग यांनी रहीमच्या दातृत्वाची व विनम्रपणाची स्तुति करणारा खालील दोहा लिहून पाठविला:—

“ सीखे कहाँ नवाबजू ऐसी देनी दैन
ज्यों कर उँचे करो, त्यौ नीचे नैन ॥ ”

त्याला उत्तर म्हणून लगेच रहीमांनी एक लाजबाब दोहा लिहून पाठविला:

“ देनहार कोऊ और है, भेजत सो दिन रैन
लोग भरम हम पै धरै, या ते नीचे नैन ॥ ’

तात्पर्य : देणारा तो परमात्मा आहे. मी एक निमित्तमात्र आहे. तो बुद्धि देतो म्हणून मी दान करतो पण लोक अज्ञानवश मलाच दानशूर म्हणतात व उगीचच माझी स्तुति करतात. चराचरावर त्याची सत्ता आहे. झाडाचा पत्तासुद्धा (पान) त्याच्या इच्छेशिवाय हालत नाही कारण कर्ता करविता ‘ तो ’ आहे. रहिमांचा हा दोहा म्हणजे त्यांच्या निःस्पृहतेचा द्योतक असून ईश्वराच्या अस्तित्वाबद्दलचा व कर्तृत्वाबद्दलचा दृढ विश्वास याचाच लिखित पुरावा नव्हे कां ?

### पाप्यास मुक्ति देई । हरिनाम नित्य घेई:

सर्वे सर्वा असणाऱ्या त्या ईश्वराचे चुकून जरी नाव घेतले तरी पाप्यालासुद्धा सद्‌गति प्राप्त होते असा रहीमांचा दृढ विश्वास खालील दोह्यात प्रगट होतो.

‘रहिमन ’ धोरवे भावसे, मुखसे निकले राम
पावन पूरन परम गति, कामादिकको धाम ॥’

**लहान दिसती—महान असती :**

असा हा बहुढंगी व बहुरंगी व्यक्तिमत्व असलेला व्युत्पन्न व प्रतिभासंपन्न कवि संवत् १६८३ मध्ये अल्ला घरी गेला असला तरी त्याचे दोहे आजही घरोघरी मोठ्या प्रेमाने म्हटले जातात. कवि रहीमांच्या दोह्याबद्दल सांगायचे तर एवढेच सांगता येईल की,

'आहेत दोहे, दिसण्यात छोटे
सांगून जातात, तात्पर्य मोठे
घेतात ते ठाव या काळजाचा
देऊनिया ज्ञान–आनंद साचा'

*

# साईभक्तांचा पत्रव्यवहार....

**श्री. संपादक यांना**

स. न. वि. वि.

फेब्रुवारीचा श्री साईकाव्यबहार विशेषांक छापून अनेक नवोदित कवींना आपण स्फूर्ती दिलीत. अंकातील सर्व काव्यरचना अती उत्कृष्ट आणि एकाहून एक सरस आहेत. अशा प्रकारे प्रथमच आपण काव्यबहार विशेषांक छापून **अनेक साई-भक्तांना कवितारुपी बोधामृत व ज्ञानामृत पाजले, ह्या बद्दल आपणांस** धन्यवाद !–

ह्या पुढेही वर्षातून एकदातरी असाच विशेषांक छापण्याची श्रीसाईसमर्थांनी आपणास प्रेरणा द्यावी, अशी श्री साईचरणी प्रार्थना.

आपली नम्र,

**सौ. विजया रामदास जोशी**
१९ टी, सेंट्रल स्कूल समोर
एअर फोर्स एरिया, लोहगाव,
पुणे ३२.

आदरणीय संपादक, श्रीसाईलीला,

सप्रेम नमस्कार,

श्रीसाईलीलेचा फेब्रुवारीचा 'श्रीसाई काव्यबहार विशेषांक' हाती पडला, वाचला आणि अतिशय आनंद झाला. आगळ्या पद्धतीने, कवि आणि रसिक या दोघांना आल्हाद देणारा हा अंक आहे. मराठी मासिक सृष्टीत हा पहिलाच यत्न धन्यवादास पात्र आहे. श्रीबाबांच्या काव्यांचे पुस्तक काढण्याची कल्पना योग्य व छान आहे. श्रीसाईलीलेचा कवि या नात्याने मी एवढेच म्हणेन की हा प्रयत्न म्हणजे कवि व रसिकांना उन्हाळ्यात अचानक येणाऱ्या थंड झुळूकीप्रमाणे सुखावेल यात शंकाच नाही. परत धन्यवाद. कळावे.

आपला विश्वासू,

**उज्ज्वल वामनराव कुळकर्णी**

नंदुरबार, जि. धुळे.

सन्माननीय संपादक 'साईलीला' यांस

सप्रेम नमस्कार वि. वि.

आपण फेब्रुवारीचा साईलीलेचा अंक 'श्रीसाई काव्य बहार' विशेषांक म्हणून प्रसिद्ध केला. तो एक अत्यंत स्तुत्य व योग्य उपक्रम होता. भक्तांचे श्रद्धास्थान असलेले शिरडीच्या साईबाबांच्या बद्दल अनेक ओघवती आणि रसाळ कविता छापून आपण भक्तांच्या आदरास पात्र झाला आहात. कविता छापून भक्तांच्यावर आपले एक प्रकारे अनेक उपकारच झाले आहेत. भक्त आपले सदैव ऋणी राहतील, अशाच कविता वरचेवर छापून भक्तांच्या आदरास पात्र व्हावे, ही नम्र विनंती.

तसदीबद्दल क्षमस्व.

आपला विश्वासू,

**अमिनगड ए. एम.**

मु. पो. गुळुंचे, ता. पुरंदर,

जि. पुणे.

श्री संपादक महाशय,

श्रीसाईलीला मासिक यांसी,

स. न. वि. वि.

आपला फेब्रुवारी १९७७ चा ‘ श्रीसाई काव्य बहार विशेषांक ’ मिळाला. वाचून फारच समाधान वाटले. जानेवारी पासूनच आम्ही या अंकाची चातकाप्रमाणे वाट पहात होतो. त्यामुळे या अंकाच्या रुपाने अमृत मिळाल्याचे समाधान व तृप्ती झाली.

असाच अंक दरवर्षी हाती पडल्यास श्रीसाई भक्तांची उत्कट भक्ती व कवीची प्रतीभाशक्ती दोहोंचा अनुभव एकाच वेळी घेता येईल.

मात्र वर्षभर प्रत्येक अंकात कवितांना स्थान दिल्यास या मासिकाची गोडी वाढेल अशी आशा वाटते.

एकंदर मासिक आवडले पण त्यातही मनाची पकड ‘ एकच माप’ ही गं. रा. भट यांची कविता घेते. कळावे, लोभ असावा ही विनंती.

आपला विश्वासू,
**पद्मनाभ मधुसुदन बाबरे**
वाणगाव

श्री. संपादक ‘ श्रीसाईलीला यांस,

मराठी मासिक परंपरेत काव्यबहार विशेषांक काढण्याची आपली कल्पना अभिनव आहे. आजवर असे फक्त कविताचे अंक कुणी काढले नाहीत ही गोष्ट खरी असली तरी फार पूर्वी ‘ काव्य रत्नावली ’ नामक मासिक निघत असे. ते अंक फक्त कवितांचेच असत. तथापि आपलीही कल्पना आगळ्या अनुभूतीचा आनंद देणारी आहे हे मान्य करायलाच हवे. अभिनव व अनुकरणीय कल्पकतेबद्दल आपले हार्दिक अभिनंदन !

आपला,
**विनायक पाठक**
बी. ए. साहित्य रत्न
बी, १७-२३४, राजावाडी
घाटकोपर, मुंबई ७७

# निष्कलंक जीवन

श्री. शाम जुवळे
जनार्दन भुवन,
छबिलदास रोड, दादर,
मुंबई ४०० ०२८.

● भगवान श्रीकृष्णाच्या दृष्टीने पहाता प्रभू श्रीरामचंद्राचे जीवन सरळ, साधे, सात्विक, सुखसमाधानाचे, संतोष-शांतीचे असे दिसते. सर्व-साधारण व्यवहारी माणसाला अनुकरणीय व आदर्शयुक्त असे हे जीवन आहे. त्या जीवनामध्ये खोडसाळपणा, आडमार्ग, अतिचतुरपणा वगैरे गोष्टींचा अभाव असल्यामुळे भक्तीभावाने जगू इच्छिणाऱ्या सरळमार्गी भक्ताला ते जीवन मनाला चटका लावणारे असेच वाटते. रामायणातील एक एक प्रसंग आठविताना भाविक भक्ताच्या जीवनामध्ये जिव्हाळा व प्रेम यांची भर पडत असते. खालील उदाहरणे याची साक्ष पटवून देणारी अशी आहेत.

श्रीराम व श्रीलक्ष्मण बालवयात एकत्र शिक्षण घेत असता श्रीरामाच्या बरोबरीने अभ्यास करण्यास श्रीलक्ष्मणास सहाजिकच थोडे अवघड जात होते; यावरील उपाय म्हणून श्रीलक्ष्मणास वेगळे बसून शिकविण्याची शिफारस करण्यात आली होती; अशा समयी श्रीरामावरील आत्यंतिक प्रेमामुळे श्रीलक्ष्मणास असे करणे रूचले नाही; श्रीरामाचा थोडादेखील विरह श्रीलक्ष्मणास सहन करविला नाही; शुद्ध प्रेमापुढे विद्येलासुद्धा हार खावी लागली; आदर्श प्रेमाचा असा दाखला इतरत्र मिळणे कठीण आहे.

रावणाने सीतामाईचे अपहरण केल्यानंतर वनामध्ये एका ठिकाणी काही दागिने जमिनीवर पडल्याचे श्रीराम-लक्ष्मणास दृष्टीस पडले; श्रीरामाने पृच्छा केल्याने श्रीलक्ष्मण त्या माऊलीच्या पायातील दागिनेच फक्त ओळखू शकला; कारण त्या माऊलीचे पवित्र पायच त्याचे लक्ष वेधून घेत असत; निर्मळ व शुद्ध मनाचे प्रतिक म्हणून श्रीलक्ष्मण नजरेसमोर उभा राहिला असता श्रीरामाचा रात्रंदिन सहवास मनाचासुद्धा कसा अंतर्बाह्य पालट करू शकतो याचे ज्वलंत उदाहरण नजरेस पडते. फक्त रामायणामध्येच असे उदाहरण गवसू शकते; जे मन श्रीअर्जुनासारख्या झुंजार वीरालादेखील श्रीकृष्णासारखा सारथी मिळूनही कसे ताब्यात ठेवता येईल याविषयी संभ्रम उत्पन्न झाला होता तेथे श्रीरामाच्या केवळ प्रेमळ सान्निध्याने श्रीलक्ष्मण आपले मन काबूत ठेवण्यास समर्थ ठरला.

श्रीरामाविषयी आणखी एक उदाहरण द्यावयाचे झाल्यास राज्याभिषेक समयी घडलेला एक प्रसंग वर्णन करता येईल; दानधर्माचे पवित्र कार्य जवळ-जवळ संपुष्टात आले होते; अशा वेळी सीतामाईला कुतुहल निर्माण झाले की प्रभू अर्जुन कोणाची मार्गप्रतिक्षा करीत उभे आहेत; तोच एक गरीब नावाडी प्रभू रामचंद्राच्या दिशेने येत असल्याचे सीतामाईच्या दृष्टीस पडले व लगेच तिच्या ध्यानात आले की याच त्या नावाड्याने वनवासात असताना आपणास विनामूल्य नदी पार करण्यास मदत केली होती; प्रभू श्रीरामचंद्राने राज्याभिषेक समयी येण्याचे खास निमंत्रण त्यास देवून ठेवल्याचेही तिला आता आठवले व प्रभूंची कृतज्ञता बुद्धी किती जागृत आहे हे पाहून तिच्या नयनात अश्रू उभे राहिले; प्रभूंनी आपल्या लाडक्या भक्तास प्रेमाने आलिंगन दिले व अशा समयी त्यास उचित असें बक्षिस देवून त्याचा मोठा गौरव केला; साध्या-सुध्या गोष्टीतही प्रभू किती दक्षतेने वागत असत हे पाहिल्यावर भाविक भक्ताला आपल्या कष्टाच्या जीवनामध्ये प्रभूंचे जीवन आदरणीय वाटले तर त्यात अचंबा वाटण्यासारखे काही नाही.

रामायण हे वरील प्रकारच्या अनेक प्रसंगानी भरगच्च भरलेले आहे.

त्रेतायुगातून मन बाहेर येवून जर कलियुगात डोकावू लागले तर त्या मनाला पुन्हा एकदा चटका लावणारे असे श्रीसाईरामाचे जीवन-चरित्र दृष्टीस पडले तर त्यात नवल नाही. व्यवहार व वेदांत एकत्र कसे नांदविता येतात याचे प्रात्यक्षिक आधुनिक काळात श्रीसाईरामाने यशस्वीपणाने करून दाखविले आहे. प्रसंगी वरवर राग आल्याचे दाखवून तर दुसऱ्या प्रसंगी अतीव प्रेमाने वागून श्रीसाईराम आपल्या लाडक्या भक्तांना अध्यात्माची शिकवण देत असत. काही झाले तरी विषयवासनांना बळी न पडता आपले लक्ष सदा देवाकडे कसे केंद्रित करता येते याची आध्यात्मिक शिकवण श्रीसाईरामाने देवून ठेवलेली आहे. श्रीसाईरामाचा हा अनमोल ठेवा जर भक्त आपल्या संग्रही ठेवील तर त्याला आपले जीवन निष्कलंक राखून जगामध्ये जगणे सुलभ होईल. कशा-चीही भुरळ पडू न देता श्रीसाईरामचरणी मन गुंतून राहिले तर ते शुद्ध व पवित्र झाल्याविना रहाणार नाही. शुद्ध व पवित्र मन असणे हे निष्कलंक जीवन जगण्याचे अत्यंत बलवान साधन होय; म्हणूनच मन हेच बंधनाला वा मुक्तीला कारण होत असते असे म्हटले आहे. ●

## ' सद्गती '

असो साईनाथा तुझी पूर्ण कृपा
तुझ्या कृपेनेच हा संसार सोपा
तुझे नाम राहो सदा माझे वाचे
हे नाम तारेल संकटी भवाचे

सदा भक्तिभावे तुला मी नमावे
तुझ्या गौरवाचे पवाडे मी गावे
घडो हाती सेवा अशी बुद्धि द्यावी
तुझ्या दर्शनाची जीवा आंस लावी

तुझा भक्त सांगे तुला गुप्त गोष्ट
तुझ्या पायी माझे भाव एकनिष्ठ
नमस्कार माझा साईच्या समाधी
तुझ्या हातीं आहे मला सद्गती ।

—शशिकला साळगांवकर
' मुक्तानिवास ', नवी पेठ, सोलापूर.

## ' सत्य साक्षात्कार '

दर्शन द्या हो साईनाथ स्वामी
महातपस्वी योगीराज तुम्ही ॥ धृ ॥

विविधरुपे जरी साईगुरुदत्त
घालविला भ्रम स्वप्नांतला ॥ १ ॥

वामस्कंदी भगवी शाल; हाती चैतन्याची काठी ।
स्पर्श होता मनाची उडाली ती भ्रांती ॥ २ ॥

शिवराम दास वंदी, घडो चरण सेवा,
हृदयीच्या गुज गोष्टी ध्यानी कळो द्याव्या ॥ ३ ॥

— श्री. शिवरामबुवा राणे
मुक्काम पोस्ट ओझरम पिंपळवाडो
व्हाया तरेळे, ता. कणकवली, जि. रत्नागिरी

63

# मेरे जीवन प्राण आधार

मेरे जीवन प्राण आधार
पल पल छिन छिन निस दिन बिते
जपत तुम्हरो ना ऽ ऽ म ॥ धृ ॥

कहते है दीन दयालू हो तुम
सुन कर आयी तेरे द्वार
डाल दो भिक्षा इस याचक को
कर दो दया का दा ऽ ऽ न ॥ १ ॥

तुम्हारे द्वार तज कर जाऊँ
तुम ही कहो कहाँ
पुकारूं किसे मैं अपना कहकर
छोड के तुम्हारो ना ऽ ऽ म ॥ २ ॥

बादल संकट के घिरे है
कहाँ हो मेरे भगवान
दौडो उबारो आयी शरण मैं
हे मेरे साईंना ऽ ऽ थ

**कु. पुष्पलता मोहरे**
बडे पोस्ट आफिस के पास,
राजेन्द्र नगर, बिलासपुर, म. प्र.

# साई-नाम-गजर

उषःकालि या शांत समयीं ।
वदा साई साई साई
प्रकाश पसरला चहूकडे
किरण धांवती पुढेपुढे ॥ ध्रु ॥

प्रभात शीतल, उगवे सूर्यही ॥ १ ॥
दाही दिशा खग किलबिलती
फुले उमलती वृक्ष डोलती ।
सुगंध वारा गाणे गाई ॥ २ ॥

भक्त मंडळी जमली सारी ।
हिंदु, यवन, ख्रिस्ती यहुदी ।
बंधू भगिनी ताअि आअी । ॥ ३ ॥

वृद्ध, तरुण, हरिजन पौर ।
मुले, मुली लहान थोर ।
गजर करिती सारे तेही ॥ ४ ॥

बाळे तान्हीं आया हातीं ।
गजर ऐकुनी रडूं लागतीं ।
नाहीं नाहीं तीं साद घालती ॥ ५ ॥

म्हणती वदा साअी साअी ।

—स. वि. गर्दे
कृष्ण प्रसाद, ६७ शिवाजी पार्क
दादर २८

# श्री साई भगवान

(चाल : देख तेरी संसारकी)

देहू आळंदी तशीच शिर्डी पुण्य समाधि स्थान
साई हा भक्तांचा भगवान ॥ धृ ॥

काशी द्वारका गया पंढरी
हरद्वार अन शिर्डी नगरी
सहा ही तीर्थे घडता पदरी पडते पुण्यदान
साई हा भक्तांचा भगवान ॥ १ ॥

ब्रह्मा विष्णु महेश बाळे
नाथ वंशी जन्मा आले
भक्तोध्दार भूवर आले शिरडीमधे भगवान ॥ २ ॥ साई हा

हा परमेश्वर साई आमुचा
करुणा सागर दीन दयेचा
हृदय फुलावर हा प्रेमाचा भ्रमण करी भगवान ॥ ३ ॥ साई हा

सकल शुभांकर राधा रमणा
या दीनाची येऊ द्या करूणा
दास विनविती साई चरणां द्या मुक्ती कल्याण
साई हा भक्तांचा भगवान ॥ ४ ॥

डी. बि. पोतनीस
२६/७ एच. बी. पिंपरी पुणे १७

# नामसाधना कशी घडेल ?

वेळपत्रक, अहिंसा, सहजीवन ।
षड्रीपूत्याग, सद्वर्तन ॥
इच्छा परिमिती, सत्यपालन ।
अनहंकार प्रेमवर्तन ॥ १ ।

विस्मरण, मौन अलिप्तता ।
श्रद्धा, सबूरी दृढता ॥
ऐसा वागे तो सेवक सत्यता ॥
तो शरणभाव पाळील न कळता ॥ २ ॥

शरणभावे नामात दृढता ।
आणि निश्चये येईल नित्यता ।
इंद्रीयदमन घडेल सुलभता ।
दुर्लभ न होईल निरपक्षतो ॥ ३ ॥

सर्वार्पण घडेल सहजचि ।
आसक्ती तुटेल संसाराची ॥
नामसाधना धरील वेगचि ।
अविरत समाधी लागे अखंडचि ॥ ४ ॥

—श्री. ज. प्र. मिरीकर
२७।४, ब एरंडवणा, पुणे-४

# भावपुष्प

सुंदर ते ध्यान शोभे शिलेवरी ।
दत्त अवतारी शिरडी गांवी ॥ १ ॥
दक्षिणेसी उभा शिष्य उपासनी ।
कच संजिवनी गोदातटी ॥ २ ॥
भाव भक्त मेळा हाती पुष्प माळा ।
साई घननीळा जपताती ॥ ३ ॥
दास म्हणे माझ्या श्री साईंचे ध्यान ।
पतित पावन बाबा साई ॥ ४ ॥

— पी. के. शिरसाट गुरुजी,
मु. पो. शिर्डी, ता. कोपरगाव.

---

# शरणागती

श्री सद्‌गुरु साई
आलो मी तव पायी ॥ ध्रु ॥

संसारामध्ये आजवर गुंतलो
अनुभवाने पूर्ण विटलो
म्हणुनी आज तुजकडे आलो
दूर लोटू नको साई ॥ १ ॥
—आलो मी तव पायी

ज्यांना मी आपले मानले
त्यांनी मजला दूर लोटले
दुःख मला हे अनिवार झालें
म्हणुनी धांव घेतली साई ॥ २ ॥
—आलो मी तव पायी

माझे अपराध घालुनी पोटी
मजसी तू घाली पाठी
नाम राहूदे माझे ओठी
हीच मागणी साई ॥ ३ ॥
—आलो मी तव पायी

— महादेव दत्तात्रय भिडे,
११९५, सदाशिव पेठ, पुणे- ३०

# शिरडी-वृत्त माहे फेब्रुवारी १९७७

या महिन्यात श्रींच्या दर्शनासाठी साईभक्तांची गर्दी नेहमीप्रमाणे होती. गुरुवार–रविवार बरीच गर्दी होती. काही कलाकारांनी श्रींच्या पुढे हजेरी दिली ती खालील प्रमाणे :–

**कीर्तन :** १) संस्थान गवई काव्यतीर्थ श्री. ग. वि. जोशी शास्त्री यांची कीर्तने एकादशी व महत्वाचे दिवशी झाली. २) ह. भ. प. भीमराव अ. देसाई यांचे कीर्तन. (जि. ठाणे)

**प्रवचन:** १) ह. भ. प. गणपत ल. पाटील, आळंदी ( देवाची )

२) ह. भ. प. ग. जी. पुरंदरे, कल्याण (जि. ठाणे)

**गायन, भजन, वादन :** १) श्री. व्ही. गोपालकृष्ण, विशाखापट्टनम्.
२) श्रीभगवान श्रीसत्यसाईबाबा सेवा समिती भजन मंडळ, देहूरोड पुणे.
३) सौ. शरयु सा. मराठे, शिरडी.
४) कु. मंगला ग. जोशी, शिरडी.
५) श्रीमती पुष्पा अ. शिंत्रे मुंबई ४.
६) श्री. व्यंकटरमण, भद्राचलम् .
७) ह. भ. प. के. बी. रमणमूर्ती, विशाखापट्टनम् .
८) श्री. बाळकृष्ण दा. विंडवे, पुणे ३०.
९) श्री. नवभारत सेवा मंडळ, कोल्हापूर भजन.
१०) श्री. बाळासाहेब बी. माळवदकर पुणे २. भजन.

**माननीयांच्या भेटी :**

१) मा. श्री. मोडकसाहेब, पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य.
२) मा. श्री. गणात्रा IAS. चीफ एक्झीक्युटीव्ह ऑफिसर, जि. प. अहमदनगर.
३) मा. श्री. टी. आर. देसाई, सीटी सिव्हील ॲण्ड सेशन जज्ज, मुंबई.
४) मा. श्री. राऊळ, डी. एस. पी., अहमदनगर.

**हवापाणी :** शिरडी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काहीं नाही.

॥ श्रीसाईबाबा प्रसन्न ॥



# श्रीसाईभक्तांना सुवर्ण संधी !

**कोणताही धंदेवाईक उद्देश न ठेवता** आम्ही खास साईभक्तांसाठी शिर्डीच्या साईबाबांची शिलाखंडावरील मूर्ति रोजच्या पूजेसाठी व अभिषेकांसाठी बनविली आहे.

मूर्ति पंचधातूची (सोने चांदी मिश्रित) असून अत्यंत मजबुत व टिकाऊ आहे. वजन ३ ते ३॥ किलो, उंची ९ इंच × ५ इंच रुंद आहे, तसेच मूर्तीच्या अंगावर रंगीबेरंगी कपडे वा अलंकार घालून व डोईस शिरपेंच अथवा फेटा बांधून मूर्ति अत्यंत शोभिवंत करता येते.

मूर्तीची मुंबईत किंमत रु. ४०१/– रुपये चारशे एक. बाहेरगावी पोस्टेज पॅकींग इन्शुरन्स रु. ५०/– रुपये पन्नास फक्त. मूर्तीच्या स्थापनेसाठी सुबक लांकडी देव्हारे, किंमत रु. १५० ते २००.

**खास लोकाग्रहास्तव** — बाबांची द्वारकामाईतील लोकप्रिय ध्यानस्थ मूर्ति पण बनविली आहे ! किंमत रु. ५०१/– रुपये पाचशे एक फक्त.

द्वारकामाईची (मशिदमाईची) अस्सल लाकडी प्रतिकृती, किंमत रु. ३०१/– रुपये तीनशे एक.

**आर्डर आगाऊ नोंधवा** — अधिक माहितीसाठी भेटा अगर लिहा :—

**श्री. मनोहर घनःशाम पितळे,** (बिल्डींग कॉन्ट्रॅक्टर)
पितळेवाडी, हनुमान रोड, विलेपार्ले (पूर्व), मुंबई ४०,००५७
फोन नंबर : ५७ ६२ ९८.

**भेटण्याची वेळ** — सकाळी ७ ते ९ संध्याकाळी ७ ते ९.